LIVE पार्श्वभूमी बीड पोर्टलसाठी
तालुका, शहर व गावनिहाय
प्रतिनिधी नेमणे आहे
संपर्क : दै.पार्श्वभूमी कार्यालय, भाजी मंडई, बीड.
संपादक गंमत भंडारी 9422295333 8623880100

# पार्श्वभूमी

रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही.
50% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.92 व 93 सारडा सेंट्रल, डी.पी.रोड, बीड.
Mob.9511511818

बीड वर्ष ३६ वे अंक ७७ वा फोन २३०१०१ दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ शनिवार | गंमत भंडारी | ई-पेपर : www.parshvbhumi.com | Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 | पाने ६ किंमत ४रु.

## एमआरईजीएस, वृक्ष लागवड, विहीरी, कामगार, बालकाश्रम, शिवभोजन थाळीत प्रचंड घोळ

# देवाभाऊ लक्ष घाला, अधिकारी आणि कंत्राटी कर्मचारी मिळून शेतकऱ्यांच्या योजनांचा ९०% पैसा खाऊ लागले

बीड दि.१३ (प्रतिनिधी):– शासकीय कार्यालयातील कोणतचं काम पैसे दिल्याशिवाय होत नाही. शेतकऱ्यांसाठी असलेल्या वैयक्तिक लाभाच्या योजनांमध्ये प्रचंड भ्रष्टाचार होऊ लागला आहे. एमआरईजीएसची कामे असतील, वृक्ष लागवड असेल, विंधन विहिरींचे अनुदान असो की कामगार नोंदणी कार्यालयातील साहित्य वाटप असो या सर्वच ठिकाणी सध्या नुसता पैशांचा बाजार मांडला गेला आहे. जिथं इमारत नाही तिथं बालकाश्रमच दाखवून अनुदान हडप करणे, शिवभोजन थाळीतही पैसे उचलून घोटाळा करण्याचे प्रकार सर्रास सुरु आहेत. यावर कोणीच काही बोलत नाही. अधिकारी, कंत्राटी कर्मचारी आणि दलाल हे सगळे मिळून शेतकऱ्यांच्या, कामगारांच्या आणि सर्वसामान्य जनतेच्या योजनांचा ९०% पैसा खाऊ लागले आहेत. धाक आणि दरारा राहिलेला नाही. स्व.अजितदादांचा धाक होता मात्र तो ही आता नाही. त्यामुळे अधिकारी, कंत्राटी कर्मचारी आणि दलालांना मोकळे रानच मिळाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब, तुम्ही आज जिल्ह्यात येतच आहात तर थोडं यामध्ये सुद्धा लक्ष घाला. विभाग प्रमुख आणि अधिकाऱ्यांचे कान टोचा. लोकप्रतिनिधींना अशा भ्रष्टाचारावर लक्ष देण्याच्या सूचना द्या. प्रशासनावर धाक आणि दरारा निर्माण करा त्याच्याशिवाय हा भ्रष्ट कारभार थांबणार नाही. पान २ वर



### एस.पी.साहेबांचे काम चांगले

बीड जिल्ह्यात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधीक्षक नवनीत काँवत आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान हे तीन मोठे अधिकारी आले त्यावेळी मोठे बदल होतील असे सर्वांनाच वाटले होते. मात्र यामध्ये केवळ एस.पी. नवनीत काँवत यांचेच काम चांगले आहे. जिल्हा पोलीस दलाला शिस्त लावण्याबरोबरच कायदा आणि सुव्यवस्था नियंत्रणात आणण्यात त्यांना यश आलेले आहे. जिल्हा परिषदेचे सीईओ रहेमान हे देखील चांगले आणि परंतु त्यांच्यावर राजकीय लोकांसह अधिकाऱ्यांचाही दबाव येतो. त्यामुळे कामे करतांना त्यांना अडचणी येतात.



### सिव्हील सर्जन कोण हे लोकांनाही माहित नाही

बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेचा जिल्हा रुग्णालयाशी नेहमीच संबंध येतो. आतापर्यंत जेवढे सिव्हील सर्जन येऊन गेले त्यांची नावे लोकांच्या आठवणीत आहेत. मात्र रस्त्यावरुन चालणाऱ्या एखाद्या नव्हे तर १० ते १५ लोकांना बीडचे सिव्हील सर्जन कोण आहे हे विचारले तर त्यांनाही माहित नाही कोण आहेत ते ? सोळंके नावाचे कोणीतरी सीएस आहेत एवढे काही जणांना माहित असेल. सिव्हील सर्जन म्हणून रुजू झाल्यापासून सोळंके यांनी फार काही विशेष कामगिरी केली नाही. जिल्हा रुग्णालयात आजही सर्वत्र अस्वच्छता आहे. अनेकदा वार्डात रुग्णांवर लक्ष सुद्धा दिले जात नाही. पान २ वर

### भ्रष्टाचारात बीड जिल्ह्याचा हात कोणीच धरु शकत नाही

भ्रष्टाचार करायचा, पैसे कमवायचे आणि स्वत:च घर भरायचं यामध्ये इथली यंत्रणा कुठेच कमी पडत नाही हे आतापर्यंतच्या अनेक प्रकरणावरुन समोर आलेले आहे. वाळुच्या गाड्यांवर जीपीएस सिस्टीम बसवून जिल्हाधिकारी कार्यालयाने या सर्व गाड्यांवर नियंत्रण ठेवण्यास सुरुवात केली होती. मात्र बीड जिल्ह्यातील वाळू माफिया असलेल्या महाभागांनी वाळुच्या गाडीचे जीपीएस काढून मोटारसायकलला बसविले होते. तेच लोकेशन कलेक्टर ऑफीसमधील कंट्रोल रुमला जात होते. इकडे मात्र वाळुच्या गाड्यांच्या अवैध फेऱ्या राजरोस सुरु होत्या. कितीही पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न केला तरी त्यावर उपाय शोधून भ्रष्टाचार करण्यात येथील अनेक महाभाग पुढे आहेत. भ्रष्टाचारात बीड जिल्ह्याचा हात कोणीच धरु शकत नाही. कोणी विचारही करु शकत नाही अशा ठिकाणी भ्रष्टाचार करुन पैसे कमविले जात आहेत.

### जिल्हाधिकारी कुठेच लक्ष घालत नाहीत

बीडचे जिल्हाधिकारी राहिलेले अनेक अधिकारी राज्यात मोठ्या पदावर गेलेले आहेत. यामध्ये तत्कालीन जिल्हाधिकारी बक्षी, राजेश देशमुख, श्रीनिवास देशमुख, सुनील केंद्रेकर असे कितीतरी नावे घेता येतील. जिल्हाधिकारी पदाच्या खुर्चीला मोठा मानसन्मान आणि अधिकार आहे मात्र सध्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन कुठेच लक्ष घालत नाहीत.



महसुल मधील एका प्रकरणात गुन्हा दाखल करण्याच्या पलिकडे त्यांची अशी विशेष कामगिरी दिसून आलेली नाही. लोकांच्या आठवणीत राहील असे कोणतेच काम त्यांच्याकडून होत नाही. रुजू झाल्यानंतर काही दिवस त्यांनी जनता दरबार घेतला, दिवस आणि वेळापत्रक सुद्धा जाहीर केले होते. नंतर मात्र जिल्हाधिकारी कार्यालयाच्या खालच्या मजल्यावरील जनता दरबाराचा बोर्ड आणि खुर्च्या धुळखात आहेत. बैठका घ्यायच्या, जाहीर आवाहन करायचं या पलिकडे जिल्हाधिकारी लोकाभिमुख कामांपासून दूरच आहेत. इंग्रजांच्या काळात एखादा इंग्रज अधिकारी जसा काम करीत होता तशीच त्यांची काम करण्याची पद्धत आहे. जिल्ह्यातील कामांसाठी जे काही टेंडर काढण्यात आलेले आहे त्या टेंडरसाठी सुद्धा त्यांनी बाहेरची एजन्सी बोलाविलेली आहे.

#### फरशी दाखवितात एक आणि पाठवितात दुसरीच

## स्वस्तिक टाईल्स विरुद्ध पोलिसात तक्रार, सगळीकडे असाच प्रकार

बीड दि.१३ (प्रतिनिधी):- फरशीच्या शोरुममध्ये गेल्यानंतर ग्राहकांना दाखवितांना दुसरी फरशी दाखवितात आणि पाठवितांना मात्र त्याच्यापेक्षा वेगळीच फरशी पाठवित असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी प्रतीक दोडके यांनी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात स्वस्तिक सिरॅमिक्स टाईल्स, ग्रेनाईट विरुद्ध तक्रार दिली आहे. जवळपास सर्वच दुकानांमध्ये असे प्रकार होतात, यापुर्वीही अनेकदा अशा तक्रारी झालेल्या आहेत.

बीड शहरातील स्वस्तिक टाईल्समधून प्रतिक दोडके यांनी फरशी खरेदी केली होती. फरशी बसविल्यानंतर ती निकृष्ट दर्जाची असल्याचे निदर्शनास आले. याबाबत त्यांनी संबंधीत विक्रेत्याकडे जाऊन तक्रार करत फरशी बदलून देण्याची मागणी केली. मात्र विक्रेत्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे फरशीमुळे झालेल्या नुकसानीची ६९ हजार ७२० रुपयांची रक्कम परत मिळावी अशी मागणी दोडके यांनी केली आहे. या बाबत त्यांनी ग्रामीण पोलीस स्टेशनकडे लेखी तक्रार करुन कारवाईची मागणी केलेली आहे. दरम्यान आम्ही जो काही फरशीचा माल दिलेला आहे तो ब्रॅण्डेड असल्याचे दुकानदाराचे म्हणने आहे.

## अन्न औषध प्रशासनवाल्यांनी चिकन नूडलसवाल्यांची तपासणी करावी

बीड दि.१३ (प्रतिनिधी):- शहरातील रस्त्या रस्त्यांवर चिकन नूडल्स व इतर चायनीज पदार्थांची दुकाने आहेत. मात्र ते पदार्थ तळण्यासाठी कोणते तेल वापरतात ? ते किती दिवसापुर्वीचे आहे याची अन्न व औषध प्रशासनवाल्यांनी तपासणी करायला हवी अशी मागणी होऊ लागली आहे.



बीड शहरातील बस स्टॅण्ड समोर, बुंदेलपुरा, बशीरगंज यासह इतर भागात चायनीज पदार्थांची अनेक दुकाने आहेत मात्र या दुकानदारांकडून चिकन नूडल्ससह इतर पदार्थ बनविण्यासाठी कोणत्या प्रकारचे साहित्य वापरले जाते. त्यांच्याकडून वापरण्यात येणारे तेल कशा प्रकारचे आहे हे कोणालाच माहिती नसते. या बाबत बीडच्या अन्न व औषध प्रशासन विभागाने एकदा सर्व चायनीज पदार्थांच्या दुकानांची तपासणी करावी, त्या ठिकाणी वापरण्यात येत असलेले साहित्य, तेल याचे नमुने तपासणीसाठी घेऊन ते खाण्यायोग्य आहेत की नाहीत ? हे ही तपासायला हवे.

## डॉ.ओमप्रकाश शेटे यांनी आशा सेविकांच्या संघर्ष व आत्मविश्वासाला बळ दिले

### आशा सन्मान सोहळ्यात वर्षा उसगावकर यांचे प्रतिपादन







दिंद्रुड दि.१३ (प्रतिनिधी):– ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था सक्षम ठेवण्यात आशा सेविकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. कोविडसारख्या कठीण काळातही आशा सेविकांनी घराघरात जाऊन तपासणी, जनजागृती व रुग्णांना मदत करून समाजसेवेचे उत्तम उदाहरण घालून दिले आहे. देशसेवा, माणुसकी आणि सेवाभाव यांचा त्रिवेणी संगम असलेल्या आशा सेविका शासकीय व सामाजिक पातळीवर कायम दुर्लक्षित असतात. मात्र आशा सेविकांच्या संघर्ष व आत्मविश्वासाला बळ देण्याचे काम डॉ.ओमप्रकाश शेटे हे प्रामाणिकपणे करत असल्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध सिनेअभिनेत्री वर्षा उसगावकर यांनी केले.

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे देवदूत प्रतिष्ठानच्या कुशल नियोजनात भव्य आशा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी आशा सेविकांना अस्सल पैठणी व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष देवदूत डॉ.ओमप्रकाश शेटे होते. यावेळी सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री वर्षा उसगावकर यांची विशेष उपस्थिती होती. मुंबई रोटरीचे एक्स गव्हर्नर राजेंद्र अगरवाल, चाइल्ड हेल्प फाउंडेशनचे मुख्य ट्रस्टी पान २ वर

### सामाजिक दरी सांधली जाईल

बीड जिल्हा या ना त्या कारणाने कायम चर्चेत असतो. आजकाल तर जिल्ह्यात काही चांगले घडतेच की नाही ? अशी शंका इतरांना यावी अशी वाईट परिस्थिती आहे. मात्र या जिल्ह्यात खूप चांगली माणसं आहेत. अनेक कर्तबगार माणसांनी आकाशाला गवसणी घालावी असे उत्तुंग कार्य केले आहे. मात्र सध्या दुर्दैवाने जिल्ह्यात सामाजिक दरी वाढली आहे याचं खूप वाईट वाटतं. त्यामुळे अशा सामाजिक उपक्रमांमधून ही दरी सांधण्याचा प्रयत्न करतोय, कारण मला संवेदनशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांची तशी शिकवण आहे. तसेच आशा सेविकांना कायम स्वरुपी सेवेत सामावून घेण्यासाठी मुख्यमंत्री महोदयांकडे प्रामाणिकपणे आग्रह धरणार आहे.



–डॉ. ओमप्रकाश शेटे
(अध्यक्ष आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समिती)

## मांजरसुंबा घाटात टँकर अपघातानतर ऑईल सांडले अनेक वाहने घसरून पडली



बीड दि.१३ (प्रतिनिधी):- तालुक्यातील मांजरसुंबा येथील घाटात शुक्रवारी रात्री उशिरा ऑईलच्या टँकरला अपघात झाला. अपघातानंतर टँकरमधील ऑईल रोडवर पसरल्यामुळे अनेक वाहनधारक घसरुन पडले.


मांजरसुंबा घाटात चालकाचे स्टेअरींगवरील नियंत्रण सुटल्याने ऑईल घेऊन जाणारे टँकर पलटी झाले. या अपघातामुळे घाटातील रोडवर सर्वत्र पान २ वर

## श्रीमंत सावंत यांचे निधन

गेवराई दि.१३ (प्रतिनिधी):- रांजणी येथील ज्येष्ठ नागरिक श्रीमंत भाऊराव



सावंत उर्फ दादा यांचे (वय ७६) अल्पशा आजाराने शुक्रवारी (दि.१३) रात्री ०८:०० वाजता निधन झाले. त्यांचा अंत्यविधी शनिवारी (दि.१४) सकाळी ९ वाजता रांजणी येथील शेतात, रोहन हॉटेलच्या पाठीमागे पान २ वर



### प्रसिद्ध दूरदर्शन अँकर सरला माहेश्वरी यांचे निधन

बीड दि.१३ (प्रतिनिधी):- दूरदर्शनच्या माजी वृत्त निवेदिका सरला माहेश्वरी यांचे निधन झाले आहे. मृत्युसमयी त्या ७१ वर्षाच्या होत्या. १९८० च्या दशकात त्या दूरदर्शनच्या प्रसिद्ध वृत्त निवेदक होत्या. आज वृत्त निवेदनाचे स्वरुप बदललले आहे. छोट्या छोट्या बातम्या पान २ वर

**स्टोअर ऑफीसर पाहिजे**
टॅली सॉफ्टवेअर, स्टोअर अनुभवी असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल
पगार – 18 हजार ते 25 हजार
:: संपर्क ::
विक्की मोटार्स
जालना रोड, बीड.
9326685085

**पाहिजेत**
डॉक्टर्स पाहिजेत
पार्ट टाईम किंवा फुल टाईम
बी.ए.एम.एस., बी.एच.एम.एस.
एम.बी.बी.एस.
अनुभवी डॉक्टर पाहिजेत
:: संपर्क ::
डॉ.एम.बी.जेसवाणी (पत्रकार)
(अध्यक्ष अमर शहिद संत कंवरराम मिशन महाराष्ट्र)
9422240593
16551

## ग्रामीण भागात उद्योजक घडावेत यासाठी पशुपालनाला कृषीचा दर्जा -मंत्री पंकजा मुंडे



- ३८ एकर क्षेत्रात विविध स्टॉलची मांडणी
- ३ दिवस चालणार पशुपक्षी प्रदर्शन
- शनिवारी मुख्यमंत्री करणार पाहणी

बीड दि.१३ (प्रतिनिधी):- पशुपालनास कृषीचा दर्जा देण्याचा महत्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे. यामुळे कृषीच्या दराने कर्ज पुरवठा करण्यासोबत पशु पालनासाठी ५० टक्के अनुदान देखील दिले जाणार आहे त्यामुळे या क्षेत्रात मोठया प्रमाणात ग्रामीण उद्योजक तयार होतील आणि यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन पशु संवर्धन तथा पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी परळी येथील भव्य अशा महा पशुधन एक्सपो २०२६ च्या उद्घाटन प्रसंगी केले. पान २ वर

## तहसीलदारांना पुन्हा मिळाले कार्यकारी दंडाधिकारी अधिकार

### प्रशासनाला बळ , नागरिकांना दिलासा

बीड दि.१३ (प्रतिनिधी):- राज्य शासनाने १० फेब्रुवारी रोजी अधिसूचना काढून महत्त्वाचा निर्णय घेत तहसीलदारांना पुन्हा कार्यकारी दंडाधिकारी म्हणून



अधिकार प्रदान केले आहेत . भारतीय नागरिक सुरक्षा संहिता , २०३३ अंतर्गत काढलेल्या अधिसूचनेनुसार राज्यातील सर्व तहसीलदारांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कार्यकारी दंडाधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले असून त्यांना मृत्यू चौकशीसह विविध अधिकार देण्यात आले आहेत. यामुळे कायदा व सुव्यवस्था राखणे , तातडीचे प्रशासकीय निर्णय घेणे आणि घटनास्थळी त्वरित प्रतिसाद देणे या बाबतीत महसूल प्रशासनाला नव्याने बळ मिळणार आहे . पान २ वर

# देवाभाऊ, आमचे हक्काचे पाणी परत द्या

## १५ हजार कोटीमध्ये नविन योजना करा, शेती पाण्याशिवाय बीडची बारामती होणार नाही

बीड दि.१३ (प्रतिनिधी):-तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी जायकवाडीतून बीड जिल्ह्यासाठी जे पाणी दिले, त्यात तब्बाल साडेतीनशे दलघमीची कपात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. बीड जिल्ह्यात शेती सिंचनाचा अनुशेष आहे, शेतीला हक्काचे पाणी नसल्याने शेती सातत्याने तोट्यात जात आहे, त्यामुळे शेतकरी आत्महत्या सातत्याने वाढत आहेत. बीडची बारामती करायची असेल तर शेतीला बारमाही पाणी आवश्यक आहे. त्यामुळे देवाभाऊ, जायकवाडी धरणाचे पाणी बीड जिल्ह्याला पूर्ववत द्यावे, पंधरा हजार कोटींतून धरण व कालव्याची कामे होणार आहेत, या निधीमध्ये बीड जिल्ह्यातील नविन योजनांचा समावेश करावा, अशी मागणी लोकलढा आंदोलनातील शेतकर्यांनी केली आहे.



बीड जिल्ह्यातील बहुतांश शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे शेतकर्यांना फळपीक, भाजीपाला, फुलशेती व ऊस पीक घेण्यात अडचणी येत आहेत. शेतीला पाणी नाही व सातत्याने पडणारा दुष्काळ यामुळे शेतकरी हतबल झाले असून शेतकरी आत्महत्या दिवसेंदिवस वाढत आहेत. शेतकरी व मजुरांना बारमाही रोजगार नसल्याने ऊसतोडीसाठी जावे लागते. यामुळे सामाजिक प्रश्नही निर्माण झाले आहेत. येथील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शेतीला जायकवाडी धरण व कृष्णा खोर्याचे पाणी मिळावे अशी मागणी लोकलढा आंदोलनातील शेतकरी सातत्याने करीत आहेत. शासनाने नदीजोड प्रकल्प करण्याचे ठरवले आहे, मात्र या प्रकल्पास अनेक वर्षे लागणार आहेत, त्यामुळे जायकवाडी धरणाचे जे पाणी शासनाने कमी केले आहे, ते पूर्ववत करून सिंदफणा पात्रात सोडावे व उपकालवा करावा, अशी मागणी प्रसिद्धीपत्राद्वारे लोकलढा आंदोलनातील शेतकऱ्यांनी केली आहे.

दोन दिवसांपूर्वी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत शासनाने पंधरा हजार कोटी रुपयांतून प्रकल्प व वितरीकांचे काम केले जाणार आहे. या निधीतून कुंठेफळ योजना, सिंदफणावरील बंधारा अशांना निधी मिळणार आहे. मात्र, या पंधरा हजार कोटी निधीतून सिंदफणा पात्रात पाणी सोडण्यासह उपकालवा करावा, अशी मागणीही लोकलढा आंदोलकांनी केली आहे.

# सरकारी कर्मचाऱ्यांच्या बदलीला मुदतवाढ नाही

## सामान्य प्रशासन विभागाचे आदेश जारी

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी):- वर्षानुवर्षे एकाच विभागात ठाण मांडून बसलेल्या सरकारी अधिकारी - कर्मचाऱ्यांच्या बदलीला या पुढे मुदतवाढ न देण्याचा किंवा त्यांची बदली रद्द न करण्याची भूमिका सामान्य प्रशासन विभागाने घेतली आहे. बदली झालेल्या संबंधितांना विभागाने रूजू होण्यासाठी कार्यमुक्त न केल्याने अनेक प्रशासकीय अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणारा विलंब लक्षात घेता बदली अधिनियमानुसार बदल्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे स्पष्ट निर्देश सामान्य प्रशासन विभागाने सर्व विभागांना दिले आहेत.

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ अधिसूचित करण्यात आला आहे. या नियमातील नियम ३ आणि ४ नुसार सहा वर्षे पूर्ण झालेल्या सहसचिव, उपसचिव, अवरसचिव, कक्ष अधिकारी, साहायक कक्ष अधिकारी, लिपिक-टंकलेखक आणि लघुलेखक संवर्गातील कर्मचारी यांच्या बदल्या करण्याबाबतची कार्यवाही एप्रिल-मे २०२६ मध्ये करण्यात येईल. मात्र, काही वर्षापासून मंत्रालयातील कर्मचाऱ्यांची बदली केल्यानंतर त्यांच्या बदलीला मुदतवाढ देण्याची मागणी तसेच बदली रद्द करण्याची मागणी केली जात असल्याचे निदर्शनाला आले आहे.

कार्यमुक्तीनंतरही कामकाज सुरळीत होणार

विभागाने २०२६ च्या सार्वत्रिक बदल्यांमध्ये विभागातील जे अधिकारी-कर्मचारी बदलीस पात्र आहेत, त्यांची यादी करून त्यांच्या जागी पर्यायी अधिकारी-कर्मचारी यांची व्यवस्था करण्याची कार्यवाही आतापासूनच सुरू करा. जेणेकरून बदली झालेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त केल्यानंतर आपल्या विभागातील कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यास अडचण निर्माण होणार नाही, असे निर्देश सामान्य प्रशासन विभागाच्या (सेवा) अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा यांनी मंत्रालयातील सर्व विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिवांना पत्राद्वारे दिले आहेत.

# एस.एम.युसूफ़ यांच्यामुळे पत्रकारितेची प्रेरणा मिळाली -इमरोज़ शेख

## पत्रकारिता क्षेत्रातील तपपुर्ती निमित्ताने हृदयी सत्क

बीड दि.१३ (प्रतिनिधी):- बीड न्यूज आपतक या हिंदी न्यूज चैनल चे मुख्य संपादक तथा आज़ाद पत्रकार इमरोज़ शरीफ शेख यांनी शहरातील ज्येष्ठ मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांच्या पत्रकारिता क्षेत्रातील तपपुर्ती निमित्ताने हृदयी सत्कार करताना वरील उद्गार काढले.

सत्कार प्रसंगी बोलताना इमरोज शेख पुढे म्हणाले की, गेल्या काही वर्षांपासून विविध वृत्तपत्रातून एस.एम.युसूफ़ यांच्या बातम्या व लेख सातत्याने वाचायचो आणि वाचत आहे. ते करीत असलेल्या लिखाणातून वाचणाऱ्यांच्या ज्ञानात व माहितीत भर पडते. शिवाय त्यांनी उचललेला प्रत्येक मुद्दा हा जमिनीशी संलग्न असतो. समाजातील दीनदलित, गोरगरीब, सर्वसामान्यांना भेडसावणाऱ्या समस्या असो की प्रश्न असो, त्यांच्या दृष्टीस पडले की, ते त्याच्यावर लिखाण केल्याशिवाय राहत नाहीत. त्यांची ही खुबी पाहूनच खरे तर मला पत्रकार होण्याचा हुरूप आला. पत्रकार होण्यामागे त्यांच्या लिखाणातून मिळालेली मोठी प्रेरणा आहे. त्यांनी नुकतेच पत्रकारिता क्षेत्रात बारा वर्ष पूर्ण केले आहेत. या अनुषंगाने त्यांच्या तपपूर्ती निमित्त माझ्याकडून एक छोटासा सत्कार करतोय असे म्हटले.

# राज्यात हवामान बदलाचे संकेत

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी):- फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात कोरडे वातावरण राहिल्यानंतर आता राज्यात हवामानाची घडी बदलताना दिसत आहे. उत्तर भारतात सक्रिय झालेल्या वातावरणाचा परिणाम महाराष्ट्रावरही जाणवू लागणार असून येत्या १७ आणि १८ फेब्रुवारीदरम्यान काही भागांत हलक्या स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते, समुद्राकडून येणाऱ्या ओलसर वाऱ्यांचा आणि जमिनीवरील तापमानातील फरकाचा परिणाम म्हणून कमी दाबाची रेषा तयार होत आहे. या परिस्थितीमुळे पुणे विभागासह मध्य महाराष्ट्रात ढगाळ वातावरण राहू शकते. काही ठिकाणी किरकोळ सरी पडण्याची शक्यता आहे. हा पाऊस जास्त वेळ राहणारा नसला तरी स्थानिक पातळीवर बदल जाणवू शकतो.

दरम्यान, राज्यात उत्तर दिशेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांचा प्रभाव कायम आहे. त्यामुळे किमान तापमानात किंचित घट झाली असून रात्रीचा गारवा वाढला आहे. विशेषतः उत्तर महाराष्ट्र, विदर्भ आणि खान्देश भागात सकाळ-संध्याकाळ थंडीची जाणीव होत आहे. पुढील एक-दोन दिवस ही स्थिती कायम राहू शकते.

पान १ वरून

## देवाभाऊ लक्ष घाला, शेतकऱ्यांच्या योजनांचा ९०% पैसा

बीड जिल्ह्यात सर्वच शासकीय योजनांच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होऊ लागला आहे. कोणतेही काम पैसे दिल्याशिवाय होत नाही. केवळ वशिला लावूनही कोणी ऐकत नाही, जोपर्यंत हातात पैशाचं वजन पडत नाही तोपर्यंत एकही फाईल पुढं सरकत नाही हा जिल्ह्यातील जनतेचा अनुभव आहे. एमआरईजीएस अंतर्गत विंधन विहिरी असुद्या किंवा वैयक्तिक लाभाच्या इतरही काही योजना असतील तिथे पैसे घेतल्याशिवाय काहीच होत नाही. गायगोट्यासाठी प्रस्ताव पाठवायचा म्हटलं तरी खालच्या कर्मचाऱ्याला पैसे द्यावे लागतात. ठिबक सिंचनसाठी एखाद्या शेतकऱ्याने अर्ज केला तर त्यालाही पैसे द्यावेच लागतात. वृक्ष लागवडीतही मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे. १० झाडे खरेदी करुन १०० झाडांचे बिल काढायचे असे अनेक उद्योग सध्या जिल्ह्यात सुरु आहेत. जिल्हा कामगार नोंदणी कार्यालय देखील त्यात मागे राहिलेले नाही. नेमक्या कोणत्या कामगारांची नोंदणी केली जाते आणि कोणत्या कामगारांना साहित्य वाटप होते, याचा कसलाच ताळमेळ नाही. जे खरे लाभार्थी आहेत, कामगार आहेत त्यांच्यापर्यंत ही योजना जातच नाही. अधिकारी, कंत्राटी कर्मचारी आणि दलाल हे संगनमताने हे सर्व ठरवितात. शिवभोजन थाळीमध्येही मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत आहे. त्याच त्या व्यक्तिला बसवून फोटो काढले जातात. हातात पारले बिस्कीटचा पुडा देऊन एखाद्याला थाळी समोर बसवायचे, फोटो काढायचे आणि पुन्हा तीच थाळी उचलून दुसऱ्या समोर ठेवून फोटो काढायचे असे प्रकार सुरु आहेत. त्यामध्ये बीड तहसिल आणि पुरवठा विभागही केवळ बघ्याच्या भूमिकेतच आहे. बालकाश्रमातही मोठा घोळ असून पैसे घेऊन मंजुरीसाठीचे प्रस्ताव पाठविले जातात. कोट्यावधी रुपये अनुदान उचलून शासनाची फसवणूक केली जाते, अशा अनेक योजनांच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार सुरु असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात लक्ष घालावे अशी मागणी होऊ लागली आहे.

## सिव्हील सर्जन कोण हे लोकांनाही माहित नाही

**शिस्त लावण्याचा तर प्रश्नच नाही. जिल्हा रुग्णालयाच्या बाजुलाच टोलेजंग इमारती पूर्ण झाल्या आहेत मात्र त्या ठिकाणी आता पुढची प्रक्रिया काय ? हे सुद्धा लोकांना माहित नाही.**

## श्रीमंत सावंत यांचे निधन

होणार आहे. गेवराई तालुक्यातील रांजणी येथील श्रीमंत भाऊराव सावंत हे व्यापारी म्हणून सर्वदूर परिचित होते. रोखठोक स्वभाव ही त्यांची ओळख होती. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते. शुक्रवारी रात्री ८ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, एक भाऊ, दोन बहिणी, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. रांजणीचे माजी उपसरपंच मोहनराव सावंत व अनिल सावंत यांचे ते वडील होत.

## डॉ.ओमप्रकाश शेटे यांनी आशा सेविकांच्या...

राजेंद्र पाठक, सिंदफणा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष शिवाजीभाऊ रांजवण, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.मधुकर घुबडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी उपस्थित हजारो महिलांशी वर्षा उसगावकर यांनी मुक्त संवाद साधला. आपल्या भाषणात पुढे बोलतांना त्या म्हणाल्या की, अशा सेविका या समाज आणि आरोग्य विभाग यांच्यातील दुवा म्हणून कार्य करतात. त्यांच्या उल्लेखनीय कामाची दखल घेऊन त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारावी आणि त्यांचा गौरव करावा ही डॉ. शेटे यांच्या मनात आलेली अभिनव कल्पनाच खरंतर विलक्षण आहे. राज्य पातळीवर काम करत असताना सुद्धा मोठ्या पदाचा कुठलाही अभिनिवेशन न बाळगता सर्वसामान्य व उपेक्षित घटकासाठी काम करणाऱ्या लोकांबद्दल त्यांची असलेली आस्था त्यांच्या मनाचा मोठेपणा सिद्ध करते असेही वर्ष उसगावकर म्हणाल्या.

याच सन्मान सोहळ्यात आशा सेविकांच्या जीवन कार्यावर नुकताच प्रदर्शित झालेल्या आशा चित्रपटाचा विशेष शो आयोजित करण्यात आला होता. तसेच देवदूत प्रतिष्ठानच्या वतीने सर्वांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. डॉ. शेटे यांच्या शब्दांवर गरीब बालके व रुग्णांसाठी सढळ मदत करणारे मुंबई रोटरीचे एक्स गव्हर्नर राजेंद्र अगरवाल व चाइल्ड हेल्प फाउंडेशनचे मुख्य ट्रस्टी राजेंद्र पाठक यांचा यावेळी विशेष सन्मान करण्यात आला. सदरील कार्यक्रम देवदूत प्रतिष्ठान व खोलेश्वर परिवार, दिंदुड यांच्यावतीने आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ.ओमप्रकाश शेटे यांनी तर आभार देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडूजी खांडेकर यांनी मानले.

## मांजरसुंबा घाटात टँकर अपघातानंतर ऑईल

ऑईल पसरले होते. यामुळे जवळपास २० ते २५ दुचाकीधारक घसरुन पडले होते. या अपघातामुळे मांजरसुंबा घाटातील ट्रॅफीक काही वेळ जॅम झाली होती.

## तहसिलदारांना पुन्हा मिळाले अधिकार

बीड जिल्ह्यातही या निर्णयाचे स्वागत होत असून , प्रशासनाच्या कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

पूर्वीच्या कायद्यानुसार तहसीलदारांना कार्यकारी दंडाधिकारी म्हणून अधिकार होते . महसूल प्रशासन आणि कायदा-सुव्यवस्था यांचा ताळमेळ राखण्यासाठी ही व्यवस्था अत्यंत महत्त्वाची मानली जात होती . गावपातळीवरील वाद , नैसर्गिक आपत्ती , मृत्यूची चौकशी , जमावबंदी आदेश किंवा तातडीचे निर्णय घेण्यासाठी तहसीलदार हेच प्रमुख अधिकारी असत . तहसीलदार हा तालुकास्तरीय शासनाचा प्रमुख प्रतिनिधी असल्याने त्याच्याकडे महसूल , निवडणुका , आपत्ती व्यवस्थापन आणि कायदा-सुव्यवस्था या सर्व जबाबदाऱ्या असत . त्यामुळे त्याला कार्यकारी दंडाधिकारी अधिकार असणे ही प्रशासकीय गरज मानली जात होती.

कायद्यातील बदलांमुळे काही काळ तहसीलदारांच्या कार्यकारी दंडाधिकारी अधिकारांवर मर्यादा आल्या . काही प्रकरणांमध्ये स्वतंत्रपणे चौकशी किंवा तातडीचे आदेश देण्यासाठी त्यांना अन्य अधिकाऱ्यांवर अवलंबून राहावे लागत होते . त्यामुळे घटनास्थळी विलंबाने निर्णय होणे , चौकशी प्रक्रियेत उशीर होणे आणि प्रशासनावर अतिरिक्त ताण येणे अशा समस्या निर्माण होत असल्याचे प्रशासकीय स्तरावर अनुभवास येत होते .

राज्य शासनाच्या नव्या अधिसूचनेनुसार आता सर्व तहसीलदारांना पुन्हा कार्यकारी दंडाधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे . त्यांना त्यांच्या अधिकारक्षेत्रात भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १९४ अन्वये मरणोत्तर चौकशी करण्याचे विशेष अधिकार देण्यात आले आहेत . या निर्णयामुळे तालुका पातळीवर त्वरित प्रशासकीय प्रतिसाद देणे शक्य होणार आहे. घटनास्थळी पोहोचून चौकशी करणे , आवश्यक आदेश देणे आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी तत्काळ निर्णय घेणे सोपे होणार आहे .

बीड जिल्ह्यात नैसर्गिक आपत्ती , अपघात , शेतकरी प्रश्न आणि सामाजिक तणाव अशा विविध परिस्थितींना तोंड द्यावे लागते. अशा वेळी तालुकास्तरावर तातडीचे निर्णय घेणारा सक्षम अधिकारी असणे अत्यंत आवश्यक असते. या पार्श्वभूमीवर तहसीलदारांना मिळालेले कार्यकारी दंडाधिकारी अधिकार हे प्रशासनासाठी हातात आलेले प्रभावी साधन ठरणार असल्याचे मत व्यक्त होत आहे .

या निर्णयाबाबत माहिती देताना तहसीलदार चंद्रकांत शेळके म्हणाले की , तहसीलदारांना कार्यकारी दंडाधिकारी अधिकार मिळाल्याने तालुकास्तरावर निर्णय प्रक्रिया अधिक जलद आणि प्रभावी होणार आहे . नागरिकांच्या अडचणींना त्वरित प्रतिसाद देता येईल . कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा आहे . ते पुढे म्हणाले की , प्रशासन लोकांच्या अधिक जवळ जाईल , निर्णय तात्काळ होतील आणि शासनाच्या सेवा अधिक परिणामकारकपणे तळागाळापर्यंत पोहोचतील .

या निर्णयामुळे सामान्य नागरिकांना तातडीच्या घटनांवर जलद चौकशी , प्रशासकीय निर्णयात विलंब कमी होणे , कायदा-सुव्यवस्था अधिक प्रभावी होणे , तालुकास्तरावरच प्रश्नांचे निराकरण होणे आणि आपत्ती व्यवस्थापनात तत्परता मिळणे असे अनेक लाभ अपेक्षित आहेत . कार्यकारी दंडाधिकारी अधिकार असलेला तहसीलदार हा तालुक्यातील शासनाचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ मानला जातो . कायदा आणि महसूल प्रशासन यांचा समन्वय साधण्यासाठी ही भूमिका अत्यंत आवश्यक असते . म्हण आहे जवळचा न्याय , त्वरित उपाय. तहसीलदारांना मिळालेले अधिकार याच तत्त्वाला बळ देणारे ठरत आहेत.

राज्य शासनाच्या या निर्णयामुळे महसूल प्रशासन अधिक सक्षम , तत्पर आणि लोकाभिमुख होणार असल्याचे स्पष्ट दिसते. तालुकास्तरावर निर्णय घेण्याची क्षमता वाढल्याने नागरिकांचा प्रशासनावरचा विश्वास अधिक दृढ होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे . बीड जिल्ह्यासारख्या आव्हानात्मक भागात हा निर्णय प्रशासनासाठी नवी ऊर्जा देणारा ठरेल , अशी भावना व्यक्त होत आहे. तत्पर प्रशासन , सुरक्षित समाज या उद्दिष्टाकडे टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

## ग्रामीण भागात उद्योजक घडावेत म्हणून पशुपालनाला कृषीचा दर्जा...

परळी येथील अंबाजोगाई मार्गालगत असणा-या ओपळे मैदान येथे हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. भव्य अशा ३८ एकर मैदानात होणारे हे प्रदर्शन १५ फेब्रुवारी पर्यंत चालणार आहे. उद्घाटन प्रसंगी परळीचे आमदार धनंजय मुंडे, पशुसंवर्धन सचिव डॉ. एन. रामा स्वामी, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पशुसंवर्धन आयुक्त प्रविण देवरे तसेच परळीच्या नगरध्यक्षा पद्मश्री धर्माधिकारी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

आरंभी प्रदर्शन स्थळी फित कापून व गौपूजन करुन सुरुवात झाली त्यानंतर औपचारिक उद्घाटन सोहळा दीप प्रज्ज्वलन करुन पार पडला यावेळी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजन तसेच स्व. गोपीनाथ मुंडे आणि स्व. अजित पवार यांना अभिवादन करण्यात आले.

पशुपालन हा व्यवसाय उद्योगात रुपांतरीत व्हावा यासाठी शासन पुढाकार घेत आहे. या खात्याचा कार्यभार स्विकारल्यावर स्व. अजित पवार यांच्या पुढाकाराने बारामतीसोबत परळी येथील पशु महाविद्यालय आपण मंजूर करुन घेतले. आजचे हे भव्य प्रदर्शन पाहून स्व. अजित पवार आज असते तर त्यानांही आयोजन आवडले असते असे पंकजा मुंडे म्हणाल्या. देशभरातुन पशू या प्रदर्शनासाठी देशातील विविध भागातील पशुधन येथे आणले आहे. या ठिकाणी देशातली सर्वात छोटी गाय तसेच विविध प्रजातींच्या गायी, बैल, घोडे आणि बकरे यांच्यासह विविध पक्षी विस्तीर्ण दालनांमध्ये ठेवण्यात आले आहेत.

या ठिकाणी स्व. अजित पवार यांच्या स्मृती प्रित्यर्थ एक स्वतंत्र दालन देखल उभारण्यात आले आहे. पशुपालन तंत्रात आलेले नवे बदल तसेच उत्पादकता वाढवणारी आणि पशुंवर उपचार करणारी औषधे या ठिकाणी उपलब्ध आहेत.

या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींची मार्गदर्शपर व्याख्याने स्वतंत्रपणे होत आहेत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उद्या प्रदर्शनाची पाहणी करण्यासाठी येत आहे. त्याचेही नियोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमानंतर मंत्री पंकजा मुंडे यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

## सरला माहेश्वरी यांचे निधन

आरडाओरडा करुन सांगितल्या जातात. १९८० च्या काळात मात्र बातम्या या अत्यंत संयमाने, शांतपणे, गंभीरतेने व मोजक्या शब्दातच सांगितल्या जात होत्या. सरला माहेश्वरी याच पद्धतीने बातम्याचे निवेदन करत असत. त्यांच्या निधनाने सर्वत्र शोक व्यक्त केला जात आहे.

**'व्हॅलेंटाईन डे' साजरा करावा की नाही याविषयी बरेच मतभेद आहेत. प्रेम हे अंतरात्म्यातून फुलणारी एक तरल भावना आहे. अशा प्रेमाला व्यक्त होण्यासाठी 'प्रदर्शनाची किंवा स्पेशल डे' ची गरजच काय ? शिवाय भारतीय संस्कृतीत इतके सणवार असताना अशा पाश्चात्य डे ची आवश्यकताच नाही असे विविध विचार प्रवाह आहेत नाही का ? परंतु प्रेमाला फुलण्यासाठी, व्यक्त होण्यासाठी जो वेळ द्यावा लागतो तो असायला हवा ना, मात्र भारत देशात व्हॅलेनटाईन डे चं नाव घेतलं की बहुसंख्य लोकांचे चेहरे लाल होतात. असल्या फालतू दिनाची गरज काय असे जो तो म्हणतो.**



# भारतीय संस्कृतीत इतके सणवार असताना अशा पाश्चात्य डे ची आवश्यकताच नाही

आठवणींची चादर ओढून प्रेमाच्या विश्वात वावरताना...

भावनांचा चाललेला कोलाहल मी शब्दात मांडतो. साचू नये मेंदूत कचरा म्हणून शब्दांनी निचरा करतो. मात्र काय करावे कळत नाही ? कारण आतून शब्दांचे झरे फुटायला लागतात. अनवरत वाहतात भावना... थांबवता थांबत नाही. शब्दांच्या आश्रयाने होतात मुक्त... मात्र, आता वाटते जावे थोडे मौनात... गाठावा एकांत जिथे मनाची नसावी चलबिचल...निर्विचार, निर्विकार होऊन बघावे केवळ साक्षी बनून स्वतःला... प्रत्येक ये, जा करणारा श्वास अनुभवत... आजच्या धकाधकीच्या जीवनात जीवन इतके गतिमान झाले आहे की, 'लाजून हसणे अन् हसून पहाणे' अशा गोष्टींसाठी वेळच नाही. त्यामुळे एकमेकांना ओळखायला, प्रेम व्यक्त करायला असे 'व्हॅलेंटाईन डे' चे निमित्त शोधले जाते. या निमित्ताने का होईना पण यंत्रमय व रुक्ष होत चाललेल्या जीवनरुपी वृक्षावर प्रेमाची पालवी फुटते. पाश्चात्यांचे अधानुकरण करणे किंवा त्यांना तिव्र विरोध करत संस्कृतीची चौकट बंदिस्त करणे या दोन्ही गोष्टी म्हणजे एकदम टोक गाठणे झाले असे होणार नाही का ? अशावेळी अशा नवीन 'डे'ज ना आपण आपल्या संस्कृतीत सामावून घेऊन आपल्या संस्काराचा रंग या पिढीच्या संकल्पनांना दिला तर...संस्कृतीच्या चौकटीची कक्षा रुंद केली तर...

खरं तर प्रेम व्यक्त करण्यासाठी कोणत्या दिवसाची वाट पहावी लागत नाही. कारण प्रेम व्यक्त करण्यासाठी चेह-यावरची लालीदेखील पुरेशी असते. तिच्या किंवा त्याच्या चेह-यावरचे हसू, नजरेचा एक कटाक्ष प्रेमाची कबुली देण्यासाठी पुरेसा असतो. पण काळाने रुपडे पालटले त्याप्रमाणे प्रेम व्यक्त करण्याच्या कन्सेप्ट बदलल्या असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. हॅशटॅगच्या जगात भावना व्यक्त करायला नानाविविध 'डे' संस्कृती आली आहे. धावपळीच्या दुनियेत व्यक्त होण्यासाठी हे 'डे' मदत करतात. नेहमीप्रमाणे फेब्रुवारी महिना आला की तरुण तरुणींना वेध लागतात ते अशाच एका प्रेमाच्या दिवसाचे म्हणजेच 'व्हॅलेंटाईन डे' चे...

प्रेम म्हणजे एक अनोखी भावना जी आपल्या जीवनाला रंगीत बनवते.

प्रेमाच्या रंगात रंगून जाणे ही एक अद्भुत अनुभूती असते. प्रेम म्हणजे एकमेकांना समजून घेणे, एकमेकांच्या खूशीत खूश असणे, एकमेकांच्या दुःखात सहभागी होणे. तसं पाहता प्रेमाचे अनेक प्रकार आहेत. त्यातील रोमँटिक प्रेम म्हणजे दोन व्यक्तींमधील आकर्षण आणि प्रेम, पारिवारिक प्रेम म्हणजे कुटुंबातील सदस्यांमधील प्रेम, मित्रत्वाचे प्रेम म्हणजे मित्रांमधील प्रेम आणि बंध नि आत्मीय प्रेम म्हणजे स्वतःच्या आत्म्याशी असलेले प्रेम.

याच प्रेमाचे काही महत्व आहेत. प्रेम आपल्या जीवनाला अर्थ देते, आपल्याला मजबूत बनवते आणि एकमेकांशी जोडते. प्रेमात पडणे म्हणजे एक अनोखी अनुभूती असते. जेव्हा आपण प्रेमात पडतो, तेव्हा आपल्या जीवनाचा एक नवीन अध्याय सुरू होतो. याच प्रेमात पडल्याचे काही चिन्हे दिसून येतात. प्रेमात पडल्यावर हृदयाची धडधड वाढते, आपल्या चेह-यावर स्मित असते, एकमेकांना पाहण्याची इच्छा असते तसेच एकमेकांशी बोलण्याची इच्छा असते. याचप्रमाणे प्रेमात पडल्याचा अनुभव स्पष्ट जाणवतो. प्रेमात पडल्यावर आपल्याला एकमेकांप्रती आदर वाटतो, एकमेकांवर विश्वास वाटतो, एकमेकांच्या जीवनात सहभागी होण्याची इच्छा असते.

तसेच या प्रेमात काही परीक्षांना सामोरे जावं लागते. प्रेमाची परीक्षा म्हणजे प्रेमात यश आणि अपयशाची कारणे. त्यातील यशाची कारणे म्हणजेच प्रेमात यशासाठी संचार, विश्वास, समजूतदारपणा आणि सहिष्णुता महत्वाचा असतो. याच गोष्टींचा अभाव हा अपयशास कारणीभूत ठरतो. प्रेम आणि विवाहातील संबंध आणि महत्त्व पाहता प्रेम अनोखा असतो. विवाह म्हणजे दोन व्यक्तींमधील एक पवित्र बंध. प्रेमाची काळजी घेणे तितकेच महत्त्वाचे असते जेणेकरून प्रेम जपले जाईल. प्रेम जपले की ते वाढीस लागेल. ज्यामुळे प्रेम यशस्वी ठरण्यास मदत होईल.

माझ्या मनात जे असते तेच तिच्या मनात असते
ते जगाला दिसत नसते जग उगाच भ्रमात असते

**शब्दस्पर्शी–सुनील शिरपुरे** (कमळवेल्ली,यवतमाळ)

पान ६ वरून

## विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

दोषी शिक्षकांविरुद्ध निलंबनाची कारवाई करण्याबाबत कळविले असल्याचे संबंधित शिक्षणाधिकारी यांनी बैठकीत सांगितले.

## गुजर समाजाकडून नगराध्यक्ष प्रतिनिधी व सभापतींचा सत्कार

अखिल भारतीय देवसेनेचे जिल्हाध्यक्ष रतन गुजर, शहराध्यक्ष हनुमान गुजर कल्याण निर्मळ, युवा सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष इंद्रजीत पांचाळ यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## आज कोळेकर महाराज यांचे कीर्तन

शुक्रवार दि. १३ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. वैभव महाराज जगताप यांचे कीर्तन संपन्न झाले.शिवरात्री महोत्सवाच्या या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन ग्रामस्थांच्या करण्यात आले आहे.

## दीपा मुधोळकर यांच्या उपस्थितीत व्यसनमुक्ती कार्यशाळा

केले यावेळी बीड येथील आधार व्यसनमुक्ती केंद्राचे तेजस घुमरे, संजय भडगळ सह राज्यातील विविध सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

## ना.फडणवीस व ना.राठोड यांच्या उपस्थितीत

मंत्री ना.पंकजाताई मुंडे, ना.गिरीश भाऊ महाजन व मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे प्रमुख रामेश्वरभाऊ नाईक यांचे देखील मोलाचे योगदान मिळाले असल्याचे तेथील महंतांनी सांगितले आहे. बंजारा विरासत नंगारा वास्तुचे भुमीपुजन तथा लोकार्पण सोहळा, सेवाध्वज कार्यक्रम अशा विविध धार्मिक सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांच्या निमित्ताने देशाचे कणखर पंतप्रधान नरेंद्रजी मोदी , गृहमंत्री अमितजी शहा, तत्कालीन मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे, देवेंद्रजी फडणवीस , एकनाथजी शिंदे , अजित दादा पवार यांनी अनेकदा हजेरी लावून लाखो बंजारा समाज बांधवांना मार्गदर्शन करून तेथे सुरू असलेल्या विविध विकास कामांची पाहणी केली आहे.१४ फेब्रुवारी रोजी आयोजित कार्यक्रमाला बंजारा धर्मगुरू तथा आमदार प.पू.बाबुसिंग महाराज,कबीरदास महाराज, सुनील महाराज, जितेंद्र महाराज, यशवंत महाराज,रायसिंग महाराज यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. मुख्य आकर्षण म्हणजे बंजारा गायिका मंगली व तरुण गायक संजू राठोडयांच्या मनोरंजनाचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. तरी संत सेवालाल महाराज जयंती निमित्त आयोजित या पर्यटन महोत्सवाचे साक्षीदार होण्यासाठी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन बंजारा एसटी आरक्षण कृती समितीचे राज्य समन्वयक तथा भाजपा भटके विमुक्त आघाडीचे प्रदेश महामंत्री प्रा.पी.टी. चव्हाण यांनी केले आहे.

## जटाशंकर मंदिराचा आज पालखी सोहळा

.यावेळी वज्र ढोल पथक बीडचे विशेष आकर्षण असणार आहे तरी भाविक मंडळींनी मोठ्या संख्येने पालखी सोहळ्याला उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## भाग्यश्री गोरे यांची निवड

सेवेतील हे उच्च पद तिने गाठले आहे या यशाबद्दल भाग्यश्री चे सर्व स्तरातून कौतुक होत असून तिच्या जिद्दीला आणि कष्टाला सर्वत्र अभिनंदन केले जात आहे. भाग्यश्री चे हे यश सावरगावसह जामखेड तालुक्यात अभिमानास्पद असून अनेक विद्यार्थ्यांसाठी नवी प्रेरणा ठरेल.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# पार्श्वभूमी



## आमीर हुसेन यांना पुरस्कार जाहीर



बीड दि १३ (प्रतिनिधी)- येथील जय महाराष्ट्र न्युज चॅनेलचे जिल्हा प्रतिनिधी आमीर हुसेन यांना पत्रकारितेतील उल्लेखनिय कार्याबद्दल महाराष्ट्र मुस्लीम कॉन्फ रन्सच्या वतीने पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. पुणे येथे लोहियानगरमधील ज्ञानज्योती सावित्रीबाई फु ले सांस्कृतिक सभागृहात रविवार दि.१५ फे ब्रुवारी रोजी हा पुरस्कार वितरण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल आमीर हुसेन यांचे अभिनंदन केले जात आहे.

## उपप्राचार्य डॉ.अमन उपगल्नवार यांना उत्कृष्ठ अध्यापक पुरस्कार पुरस्कार प्रदान

जामखेड दि १३ (प्रतिनिधी)- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित विशेष समारंभात चांदवड येथील श्रीमान सुरेशदादा जैन औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे उपप्राचार्य व फार्माकोलॉजी विभागप्रमुख डॉ.अमन उपगल्नवार यांना विदयापीठाचे कुलगुरु डॉ.सुरेश गोसावी,प्र-कुलगुरु डॉ.पराग कालकर यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत उत्कृष्ठ अध्यापक पुरस्कार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले बद्दल त्यांचेवर शुभेच्छा चा वर्षा होत आहे.

# रस्ता नको पण गतिरोधकाला आवरा म्हणण्याची वेळ मुख्याधिकारी साहेब गल्लीबोळातील गतिरोधक काढा

बीड दि १३(प्रतिनिधी)- बीड शहरातील गल्लीबोळातील रस्त्याच्या दुरुस्तीच्या मागणीसाठी कितीही अर्ज दिले, निवेदनं दिले, वृत्तपत्रातून व सोशल मीडिया मधून कितीही बातम्या झळकल्या तरी, संबंधित भागात तीन तिन वर्ष डांबरी अथवा सिमेंट रस्ता होत नाही. आणि झाला तर तो तीन वर्ष टिकेल याची गॅरंटी नाही. अशा प्रकारच्या विकासातच गल्लीगोळातील रस्त्यावर नेत्याच्या संबंधित व स्वतःला कार्यकर्ते म्हणून घेत असलेल्या काही लोकांनी आपल्या घरासमोर बेकायदेशीर गतिरोधक टाकले आहेत. या संदर्भात अनेकदा आवाज उठवला गेला असताना देखील बीड नगरपालिकेने याकडे लक्ष दिलेले नाही. यातच बीड नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांनी कुठल्यातरी रस्त्यावरील बेकायदेशीर गतिरोधक काढून टाकले अशा प्रकारची बातमी वाचण्यात आल्यानंतर या मागणीला पुन्हा जोर येऊ लागला आहे .मुख्याधिकारी साहेब. आम्हाला चांगला रस्ता कधी द्यायचा ते द्या आम्ही खड्ड्यातून गाड्या चालवू . गतिरोधकांमुळे दुचाकी स्वारांचे कंबरडे जाऊ लागले, डबल सीट बसलेल्या बाया बापडच्या कधी कधी पडू लागल्या, त्यामुळे मुख्याधिकारी साहेब रस्ता नको पण गल्लीगोळातील गतिरोधक आवरा असे म्हणण्याची वेळ जनतेवर येऊ लागली आहे. तेव्हा मुख्याधिकाऱ्यांनी शहरातील गल्लीबोळात असलेले बेकायदेशीर स्पीड बेकार पाहून ते काढून टाकावेत अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

बीड शहरामध्ये कोणत्याही गल्लीबोळात पहा. मन मानेल तसे गतिरोधक केलेले आहेत. काही गल्ल्यांमध्ये तर दुचाकी चालविता येत नाही एवढा ठिकठिकाणी उटिंगर करून ठेवलेला आहे. वीस फुटाच्या रस्त्यावर शंभर फुटावर एक गतिरोधक अशी अवस्था जिथे तिथे दिसून येईल. हे गतिरोधक सर्वसामान्य नागरिकाने आपल्या घरासमोर टाकलेले नाहीत तर कुठल्यातरी नेत्याच्या जवळच्या व कार्यकर्ता मनवणाऱ्याच्या घरासमोर असलेले दिसून येतील. गतिरोधक टाकले तरी त्याला मर्यादित उंची असावी. अर्धा अर्धा फुटाचे गतिरोधक कित्येक ठिकाणी दिसून येतील .यामुळे दुचाकी स्वारांचे कंबरडे जात असून दुचाकीच्या हँडलन देखील दुखणे काढले असल्याने नाहक दुरुस्तीचा खर्च सहन करण्याची वेळ येत आहे. विशेष म्हणजे अशा गतिरोधक वरून दुचाकी नेताना पाठीमागे बसलेली महिला पडण्याच्या घटना देखील घडलेल्या आहेत व घडत आहेत. संबंधित लोकांना सहनही होत नाही आणि सांगताही येत नाही. मांजराच्या गळ्यात घंटी कोणी बांधावी ? म्हणून कुणाच्या नावाने तक्रारी केल्या जात नाहीत, त्यांच्यावर गप्प बसण्याची वेळ येत आहे. तेव्हा मुख्याधिकारी साहेब रस्ता कधी करायचा ते करा, परंतु मन मानेल तेथे ज्यांनी त्यांनी टाकलेले गतिरोधक तरी काढून टाका खराब रस्त्यावरून दमानी जायची आम्हाला सवय आहे. पण स्पीड बेकर वरून गाडी नेताना देवाची आठवण आल्याशिवाय राहत नाही. तेव्हा मुख्याधिकारी साहेब वार्डा वार्डात जाऊन गल्लीबोळातील रस्त्यावरील स्पीड बेकर पहा आणि बेकायदेशीर गतिरोधकावर जेसीबी चालवा. अशी मागणी जोर धरू लागली आहे.

### नगराध्यक्ष ताईंना स्व.अतहर बाबर यांचे सारखं कठोर बणावच लागेल

काही वर्षाखाली म्हणजे स्वर्गीय अतहर बाबर यांच्या काळापर्यंत बीड नगर परिषदेची सत्ता ज्यांच्याकडे होती. त्यांच्या काळातील वृत्तपत्राच्या बातम्या बघा . रस्त्यावर अतिक्रमण, किंवा कुणाकडून लोकांना सार्वजनिक ठिकाणी कसा त्रास होतो या संदर्भातील बातमी पाहायला मिळणार नाही. परंतु आज अशी अवस्था आहे की बीड करांना त्रास सहन करण्याची सवय होऊन गेली आहे. स्व.अतहर बाबर हे कडक शिस्तीचे व कायद्याचे रक्षक असे नेते होते. ज्यांनी कोणी त्यांना चहाचे निमंत्रण दिल आणि ते चहा घेण्यासाठी गेले तर चहा पाजणाऱ्याच्या घरासमोरील रस्त्यावर असलेला ओटा दिसून येताच ते कर्मचाऱ्यांना तोडण्याची सूचना लागलीच करीत होते असे जुने लोक सांगतात. तेव्हा नगराध्यक्ष ताईंनी देखील स्वर्गीय अतहर बाबर यांच्या सारखे खडक धोरण राबवत शिस्त लावावी व कोणाचाही मुलाहीजा न ठेवता रस्त्यावरील बेकायदेशीर स्पीड बेकर काढण्यासाठी पुढाकार घ्यावा. अशी आम जनतेची मागणी होत आहे.

## युरिया मिश्रित बोगस पशुखाद्य प्रकरणी तात्काळ कारवाईची करावी -वसंत मुंडे

मुंबई दि १३ (प्रतिनिधी) - नाशिक जिल्ह्यातील गोदरेज अँग्रोव्हेट पशुखाद्य कारखान्यावर दि. २१ मार्च २०२५ रोजी गुन्हा नोंद होऊनही महाराष्ट्र शासनाकडून राजकीय दबावामुळे कारवाई का केली जात नाही ?, असा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला करत युरिया मिश्रित बोगस पशुखाद्य प्रकरणी तात्काळ कारवाईच करावी अशी मागणी केली आहे.

एफआयआरमध्ये जोडलेल्या ई-वे बिल व डिलिव्हरी चलनानुसार फेब्रुवारी ते मार्च २०२५ दरम्यान गोदरेज युनिटसाठी अनेक तुकड्यांमध्ये टेक्निकल ग्रेड युरियाची खरेदी व वाहतूक करण्यात आली. हा युरिया औद्योगिक वापरासाठी असल्याचे स्पष्ट नमूद करण्यात आले असून तो पशुखाद्यासाठी अपात्र आहे.पशुखाद्यामध्ये टेक्निकल ग्रेड युरियाचे बेकायदेशीर मिश्रण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून जनावरांच्या आरोग्यासाठी मोठा धोका निर्माण झाला आहे. प्रयोगशाळेच्या निष्कर्षानुसार पशुखाद्याच्या नमुन्यामध्ये युरियाचा वापर झाल्याचे आढळून आले असून त्यामध्ये टीएन ४६.०६ व बेंझीन द्रावणीय घटक भेसळीत आढळले आहेत.हे निष्कर्ष ग्लोबल केमिकल मिनरल कंपनी, जातीय केमिकल प्रायव्हेट लिमिटेड व रुद्र ट्रान्सपोर्ट कंपनी यांच्या संशयित बॅच क्रमांक व खरेदी नोंदीशी जुळत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधितांनी कायदेशीर तरतुदींचे उल्लंघन केल्याने पशुखाद्य, अन्न सुरक्षा व सार्वजनिक सुरक्षा अधिनियमातील कलम ३२ (ड), ७, ८, ९ व १० अंतर्गत गंभीर गुन्हे नोंदविण्यात आले आहेत; मात्र अद्याप कारवाई करण्यात आलेली नाही. महाराष्ट्र शासनाने दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी गोदरेज पशुखाद्य युनिट कायमस्वरूपी बंद करण्याचे आदेश दिले असूनही कारवाई का केली जात नाही ?, यास पशुसंवर्धन मंत्री, प्रधान सचिव व पशुसंवर्धन आयुक्त जबाबदार असल्याचा गंभीर आरोप कॉंग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी पुराव्यासह शासनाकडे निवेदनाद्वारे केला आहे.

## केज मधील जि.प.माध्यमिक शाळेची चार एक्कर जागा हस्तांतरणाचा घेतलेला ठराव तात्काळ रद्द करा भाई मोहन गुंड यांची नगरपंचायत कडे मागणी

केज दि १३ (प्रतिनिधी) केज नगरपंचायत हद्दीतील सर्वे नंबर ७ मधील जिल्हा परिषद शाळेची ४ एक्कर जमीन नगर पंचायतला हस्तांतरीत करण्यासाठीचा घेतलेला ठराव घेत नगर पंचायतने जेथे कुठे हस्तांतरणाच्या बाबती मध्ये प्रस्ताव करून मागणी केल्या आहेत, तेथे ठराव रद्द केल्या बाबतचे पत्र नगर पंचायत ने संबंधित विभागाला देऊन ठराव रद्द केल्या बाबतचे कळवावे. अशी मागणी नगरपंचायतचे मुख्य कार्यकारी अधिकारी, नगराध्यक्षा सौ. सिताताई बनसोड यांच्या कडे शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड यांनी करून अन्यथा नगरपंचायत समोर भव्य आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला आहे.सदरील शाळा कायमची बंद पडलेली नाही. तिथे आज ही प्राथमिक शाळा चालु आहे, माध्यमिक शाळा चालु करण्या संदर्भात सर्व वरीष्ठ पातळी वर पत्र व्यवहार चालु आहेत. दि.२६ जानेवारीला माजी विद्यार्थ्यांचा मोठा मेळावा संपन्न झाला, मेळाव्यात सर्वांनी शाळा सुरू करण्यासाठी प्रयत्नशील आहेत, येत्या जुन मध्ये शाळा सुरू होणार आहे. केज शहरातील नागरीक या शैक्षणिक चळवळीत सहभागी झाले आहेत, जुन मध्ये शाळा सुरू होणार आहे, त्यामुळे शहरातील लेकरांचे भाविष्य येथे घडणार आहे, नगरपंचायतने घेतलेला जमीन हस्तांतराचा ठराव तात्काळ रद्द करावा. अशी विनंती करत ठराव रद्द न केल्यास नगरपंचायत कार्यालया समोर आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनात शेकाप नेते भाई मोहन गुंड यांनी दिला आहे, निवेदनाच्या प्रति बीड जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना ही पाठवण्यात आल्या आहेत.

## पाटोदा तालुक्याचे ठिकाण असूनही एसटीच्या अनेक बस चूंबळी फाट्यावरून जात असल्याने आंदोलनाचा इशारा



पाटोदा दि १३ (प्रतिनिधी)- पाटोदा हे तालुक्याचे ठिकाण असूनही अनेक एसटी महामंडळाच्या बसेस ह्या पाटोद्यापासून पाच किलोमीटर अंतरावरून चुंबळी फाट्या वरून जातात या संदर्भात अनेक संघटनांनी आंदोलने केली. मात्र आश्वासन व्यतिरिक्त महामंडळाने पाटोदा बाहेरून जाणाऱ्या एसटी बसेस ह्या पाटोदा वळवाव्यात अन्यथा पुन्हा तीव्र आंदोलन छेडावे लागेल असा इशारा पाटोदा ग्रामस्थ, व्यापारी विद्यार्थी वर्गाने दिला आहे

एसटी महामंडळाच्या महत्त्वाच्या अनेक बसेस या पाटोदा ठिकाणी न येता चुंबळी फाटा मार्गे जातात. पाटोदा तालुक्याचे ठिकाण असून पाटोद्याचे नागरिक व्यापारी यांना फाट्या वरून जाणाऱ्या गाड्या ह्या चुंबळी फाटा येथे थांबतात व त्या ठिकाणाहून पाटोदा येथील प्रवाशांना पाटोदा शहरात येण्यासाठी कसल्या प्रकारची लवकर सुविधा मिळत नाही यामुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागतो. चुंबळी फाटा मार्गे जाणाऱ्या बसेस या पाटोदा शहरात यावत यासाठा अनक संघटनांनी अनेक वेळा मोठे आंदोलन छेडली मात्र आश्वासनाव्यतिरिक्त काहीही मिळाले नाही विशेष म्हणजे रात्री येणाऱ्या अनेक बसेस या ह्या पाटोदा एसटी बस स्थानकात न येता प्रवाशांना पाटोद्यातील शिवाजी चौकातच सोडतात अनेक वेळा या संदर्भात प्रवाशांची व वाहन चालक वाहक यांच्याशी वाद विवाद होतात मात्र एसटीचे वाहक प्रवाशांच्या या मागणीकडे दुर्लक्ष करतात. यामुळे अनेक प्रवाशांना रात्रीचा मोठा त्रास सहन करावा लागतो.

पाटोदा येथे तहसील कार्यालय, पंचायत समिती, न्यायालय, ग्रामीण रुग्णालय, शासकीय व खासगी बँका तसेच शैक्षणिक संस्था आहेत. विविध शासकीय कामांसाठी दररोज तालुक्यातील नागरिकांची मोठी वर्दळ असते. मात्र एसटी बस थेट बसस्थानकात न आल्याने प्रवाशांना चुंबळी फाट्या वर उतरून खासगी वाहनांचा आधार घेऊन शहरात यावे लागते..विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि शेतकरी वर्गाला या परिस्थितीचा सर्वाधिक फटका बसत आहे. काही वेळा सायंकाळी बस न मिळाल्याने नागरिकांची गैरसोय होते. व्यापारी वर्गाच्याही मते, पाटोदा मार्गे अनेक बससेवा मिळत नसल्याने बाजारपेठेवर परिणाम होत आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींनीही या प्रश्नावर लक्ष देऊन एसटी प्रशासनाशी चर्चा करण्याची गरज व्यक्त केली आहे. पाटोदा बसस्थानकात सर्व प्रमुख गाड्यांचा नियमित थांबा द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे...

## होळ वीज उपकेंद्रात १० एम व्ही ए क्षमतेचे रोहित्र तात्काळ न बसवल्यास बेमुदत ठिय्या आंदोलन



केज दि १३ (प्रतिनिधी)- तालुक्यातील होळ येथील ३३ के.व्ही.विद्युत उप केंद्रात दहा एम व्ही ए क्षमतेचे रोहित तात्काळ न बसवल्यास बेमुदत ठिय्या आंदोलन करण्यात येईल असा इशारा क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांनी महावितरण च्या मंडळाचे अधीक्षक अभियंता प्रेमसिंग राजपूत यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे.निवेदनात नमूद केले की या ३३ केव्ही उपकेंद्रातून केज तालुक्यातील लाडेगाव, दिपेवडगाव, लाडेवडगाव, मुलेगाव येथील शेतकऱ्यांना शेती साठी वीज पुरवठा दिला जातो. मात्र सद्यस्थितीत होळ ३३ के.व्ही.वीज उपकेंद्रा तुन क्षमतेपेक्षा अधिक वीजेची मागणी असुन वरिल गावातील जवळ पास सर्वच फिडर वरील रोहित्रातुन कमी दाबाने व अनियमितपणे शेतकऱ्यांना तब्बल ३० तास व काही फिडर वर ३६ तासानंतर फक्त ६ तास वीजपुरवठा दिला जात आहे.यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे भिजवणे होत नसून पिके वाळून जात आहेत.या सर्वच गावातील शेतकऱ्यांना उच्च दाबाने दिवसा आठ तास वीज देण्याच्या मागणीसाठी कुलदिप करपे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांच्या वतीने आंदोलन देखील करण्यात आली तेव्हा महावितरणअधिकाऱ्यांनी लेखी दिलेल्या लेखी आश्वासनुसार सदर आंदोलनस्थगित करण्यात आले होते या पत्रातील आश्वासनानुसार होळी विद्युत ३३ के.व्ही वीज उपकेंद्रात १० एम व्ही ए क्षमतेचे रोहित्र बसवून वीजपुरवठा उच्च दाबाने सर्व कृषि ग्राहकांना पुरवठा करणे आवश्यक होते मात्र अद्यापही रोहित्र न बसवल्याने बुधवार रोजी अधीक्षक अभियंता प्रेमसिंग राजपूत यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन दिले यात शुक्रवार दि.२० फेब्रुवारी २०२६ पासुन बेमुदत ठिय्या आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आल्याचे नमूद करण्यात आले.

## संत ज्ञानेश्वर नगर मधील दक्षिणमुखी हनुमान मंदिर येथे धार्मिक कार्यक्रम

बीड दि १३ (प्रतिनिधी)- श्री संत ज्ञानेश्वर नगर येथील श्री दक्षिण मुखी हनुमान मंदिरासमोर पाच दिवसीय विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.सदरील कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन जगन्नाथ यमपुरे, कारभारी सानप यांनी केले आहे. दिनांक १३ फेब्रुवारी २०२६, शुक्रवारी प्रत्येक एकादशीप्रमाणे सकाळी श्री संत तुकाराम महाराज यांच्या भावार्थ गाथेचे निरूपण होऊन श्री संत एकनाथ महाराज यांच्या भावार्थ रामायण कथेसह एकादशी निमित्त विशेष प्रवचनाने सूरूवात झाली. दिनांक १४ फेब्रुवारी शनिवारी सकाळी गाथा निरूपण व भावार्थ रामायण होईल. द्वादशी निमित्त दुपारी महाप्रसादाचे आयोजन दि.१५ फेब्रुवारी रविवार (महाशिवरात्र) दिवशी एकादशीप्रमाणे सर्व धार्मिक कार्यक्रम दि. फेब्रुवारी सोमवार गाथा निरूपण व भावार्थ रामायण होईल.तर दुपारी महाप्रसाद मंगळवार दि. फेब्रुवारी पहाटे श्री दक्षिण मुखी हनुमान यांना जलाभिषेक करून सकाळी गाथा निरूपण व रामायण कथा होईल.

# पत्रकार नवनाथ आडे यांच्या तक्रारीची शासनस्तरावर दखल

गेवराई दि.१३ (बापू गाडेकर) - तालुक्यातील उमापूर येथील भारतीय स्टेट बँकेच्या शाखेत दिव्यांग पत्रकार नवनाथ आडे यांना शाखा व्यवस्थापकाकडून अपमानास्पद वागणूक देण्यात आल्याच्या तक्रारीची राज्य शासनाने गंभीर दखल घेतली आहे. संबंधित प्रकरणात दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या कलम ७ अन्वये तसेच दिव्यांग कल्याण विभागाच्या दि.१३ नोव्हेंबर २०२५ च्या शासन निर्णय क्र.दिव्यांग-२०२५/प्र.क्र.२२/कार्यासन-१ नुसार कार्यवाही करून सात दिवसांच्या आत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांना देण्यात आले आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या अवर सचिवांनी पोलीस अधीक्षक बीड यांना पाठवलेल्या पत्रात नवनाथ आडे यांनी ईमेलद्वारे केलेली तक्रार विचारात घेऊन तात्काळ कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. विशेष म्हणजे हि बाब थेट मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयापर्यंत पोहोचली असून मुख्य सचिवाकडून संबंधित विभागाकडे आवश्यक कार्यवाहीसाठी ती पाठविण्यात आली आहे.

दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनीही या प्रकरणाची गांभीर्याने नोंद घेत पुढील कार्यवाहीसाठी निर्देश दिले आहेत. तक्रारीनुसार उमापूर येथील एसबीआय शाखेत व्यवहारासाठी गेलेले दिव्यांग पत्रकार नवनाथ आडे यांना शाखा व्यवस्थापकाकडून अपमानास्पद वागणूक देण्यात आली. या संदर्भात रितसर तक्रार दाखल करूनही अपेक्षित कारवाई झाली नसल्याने त्यांनी शासनस्तरावर पाठपुरावा केला होता. अखेर राज्य शासनाने दिव्यांग व्यक्तींच्या सन्मान व अधिकारांच्या संरक्षणासाठी असलेल्या कायद्याचा आधार घेत जिल्हा प्रशासनाला स्पष्ट निर्देश दिल्याने या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे.


## महिलांच्या कबड्डी स्पर्धा उत्साहात संपन्न स्पर्धेत ७५ वर्षाच्या आजीबाईचाही सहभाग

गेवराई दि १३ (प्रतिनिधी) क्रांती महिला असंघटित कामगार युनियन, महाराष्ट्र राज्य व कोरो इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ११ फेब्रुवारी २०२६ रोजी जगदंबा आय.टी.आय. कॉलेज, गेवराई येथे महिलांसाठी भव्य कबड्डी स्पर्धा घेण्यात आल्या.

महिलांच्या क्रीडा कौशल्याला वाव मिळावा, त्यांच्यात आत्मविश्वास वाढावा आणि संघभावना दृढ व्हावी या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी शारदा स्पोर्ट्स अकॅडमी गेवराईचे अध्यक्ष रणवीर काका पंडित, कोरो इंडियाच्या लक्ष्मी ताई वाघमारे, क्रांती महिला संघटनेच्या संस्थापक अध्यक्षा शाहीन पठाण, शेर-ए-हिंद संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शेख आमेर पाशा, कोरोचे विलास मगरे, रुक्मिणी नागापुरे, तेजस्विनी भोर, शिवप्रताप संस्थेचे सुधाकर बुकन सर, निर्धार संस्थेचे नारायण ढवरे सर, रुलर डेव्हलपमेंट संस्थेचे संजय आगळे सर, दै. कार्यारंभचे पत्रकार विनोद नरसाळे व संपादक शेख अमीन आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना रुक्मिणी नागापुरे यांनी केली, तर लक्ष्मी ताई वाघमारे यांनी महिलांच्या सक्षमीकरणाबाबत मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन तेजस्विनी भोर यांनी केले. या स्पर्धांमध्ये एकूण १३ संघांनी सहभाग नोंदविला. अत्यंत चुरशीच्या आणि रोमांचक झालेल्या सामन्यांमध्ये प्रथम क्रमांक - जय तुळजाभवानी संघ, गेवराई द्वितीय क्रमांक - जिजामाता संघ, गेवराई तृतीय क्रमांक - यशस्वी संघ, गढी गेवराई या संघांनी पटकावले.

विशेष म्हणजे ७५ वर्षांच्या आजींनी देखील उत्साहाने मैदानात उतरून कबड्डी खेळत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अंजुम पठाण, शकुंतला घुन्नासे ताई, मोहन धुरंधरे, शीतलताई गोचडे, सुवर्णा मस्के, कोच कापसे सर तसेच कोरो टीम, क्रांती महिला संघटना व शेर-ए-हिंद संस्थेच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## श्रीमती शिवगंगा सोनेकर यांचा महाविद्यालयात सन्मान




बीड दि १३( प्रतिनिधी)- येथील श्री बंकटस्वामी महाविद्यालयातील श्रीमती शिवगंगा सोनेकर यांना रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाउन यांच्या वतीने प्रदान करण्यात आलेल्या ''रोटरी व्होकेशनल सर्व्हिस अवॉर्ड'' पुरस्काराबद्दल महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

या निमित्ताने आयोजित सत्कार समारंभास श्री बंकटस्वामी शिक्षण संस्थेच्या सचिव श्रीमती सरोज सोंडगे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर धांडे, उपप्राचार्य डॉ. शिवाजी मोरे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. ब्रम्हनाथ मेंगडे तसेच प्रा. छाया सोंडगे व प्रा. वर्षाताई भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.याप्रसंगी मार्गदर्शन करताना श्रीमती सरोज सोंडगे म्हणाल्या की, ''प्रामाणिकपणे व निष्ठेने केलेल्या कार्याचा समाजाकडून होणारा सन्मान हा इतरांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरतो. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रकाश कोंका यांनी केले.

## चंपावती महोत्सवात भगवान इंग्लिश स्कूलने पटकावला ना.एकनाथ शिंदे महाकरंडक



बीड दि १३ (प्रतिनिधी)- चंपावती महोत्सव २०२६ मध्ये यंदा श्री भगवान इंग्लिश स्कूल, बीड या शाळेने उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे महाकरंडक पटकावला आहे. तसेच शाळेच्या संगीत शिक्षिका शुभांगी मोरे मॅडम यांना सर्वोत्कृष्ट संगीत शिक्षका या पुरस्काराने गौरविण्यात आले. या घवघवीत यशामुळे शाळेचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

या महोत्सवात आयोजित करण्यात आलेल्या समूह नृत्य, वैयक्तिक गायन, वैयक्तिक नृत्य , चित्रकला आणि अशा विविध स्पर्धांमध्ये श्री भगवान इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी अत्यंत प्रभावी सादरीकरण केले. विशेषतः समूह नृत्य स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलाविष्काराने उपस्थितांची मने जिंकली. सर्व स्पर्धांमधील गुणांच्या जोरावर शाळेने सर्वोत्कृष्ट शाळा म्हणून हा महाकरंडक आपल्या नावे केला.

महोत्सवाच्या पारितोषिक वितरण समारंभाप्रसंगी उपस्थित मान्यवर शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतीक कांबळे व आदी मान्यवर यांच्या हस्ते शाळेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक व विद्यार्थी प्रतिनिधींना हा भव्य करंडक देऊन गौरविण्यात आले. या यशाबद्दल शाळेचे संस्थाचालक, पालक आणि बीडकरांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे व शिक्षक वृंदाचे अभिनंदन केले आहे.

## प.पू.गोळवलकर गुरुजींनी समरसता व समर्पणाची भावना जपण्याची शिकवण दिली-उमेश जगताप

बीड दि १३ (प्रतिनिधी) - स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालयात परमपूज्य गोळवलकर गुरुजी यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाचे मुख्य वक्ते उमेश जगताप यांनी बोलताना गोळवलकर गुरुजींच्या जीवनकार्यावर सखोल प्रकाश टाकतांना, ''परमपूज्य श्रीगुरुजींनी केवळ संघटना बांधली नाही, तर व्यक्तिनिर्माणातून राष्ट्रनिर्माणाचे महान कार्य केले. त्यांचे विचार आजही तरुणांना देशाला परमवैभवाप्रत नेण्यासाठी दिशा देणारे आहेत. गुरुजींनी समाजात समरसता व समर्पणाची भावना जपण्याची शिकवण दिली. ते आजच्या पिढीने अंगीकारण्याची गरज आहे. असे प्रतिपादन जगताप यांनी केले.कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना शालेय समितीचे अध्यक्ष प्रमोदराव कुलकर्णी यांनी गुरुजींच्या शिस्तीचे आणि ध्येयनिष्ठेचे दाखले दिले. ''या प्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे मुख्य प्रशासकीय समन्वयक तथा मुख्याध्यापक प्रा. चंद्रकांत मुळे आणि उपमुख्याध्यापक संदीप देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते पूज्य गुरुजींच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले.प्रास्ताविक व सूत्रसंचालन मुकुंद मिरगे यांनी केले. तर आभार प्रदर्शन विनायक कुलकर्णी यांनी केले.

# संपादकीय

## सौंदर्याची खाण, बॉलिवूडची शान मधुबाला

बॉलिवूडची मर्लिन मनरो, सौंदर्याची खाण, बॉलिवूडची शान, चित्रपट सृष्टीतीलच नव्हे तर भारतातील सर्वात सुंदर महिला असे जीचे वर्णन केले जाते त्या मधुबाला यांचा आज जन्मदिन. आज त्यांची ९३ वि जयंती. १४ फेब्रुवारी १९३३ रोजी दिल्लीच्या एका पश्तून कुटुंबात जन्मलेल्या मधुबाला यांचे मूळ नाव मुमताज बेगम जहाँ देहलवी. असे म्हणतात की मधुबाला यांच्या जन्मानंतर एका व्यक्तीने तिच्या बाबत असे भविष्य वर्तवले होते की ती तिच्या आयुष्यात खूप ख्याती मिळवेल. पैसा अडका, धन संपत्ती मिळवेल पण तिचे आयुष्य अतिशय दुःखी असेल. या भविष्यावर विश्वास ठेवून तिचे वडील तिला मुंबईला घेऊन आले. वयाच्या नवव्या वर्षी म्हणजे १९४२ साली मधुबाला यांनी बेबी मुमताज या नावाने चित्रपटात भूमिका करण्यास सुरुवात केली. बाबुराव पटेल आणि डॉ सुशीलाराणी पटेल या दाम्पत्याचा मधुबाला वर विशेष लोभ होता त्यांनीच तिला मधुबाला हे नाव दिले. बालवयातच चित्रपटात काम करू लागल्याने मधुबाला या शाळेत जाऊ शकल्या नाहीत त्यामुळे त्यांना इंग्रजी येत नसे मात्र उर्दू भाषा येत होती. चित्रपटात भूमिका करण्यास सुरवात केल्यावर मात्र तिने इंग्रजीवर चांगले प्रभुत्व मिळवले. तिचे वडील कडक शिस्तीचे असल्याने ती कधीही चित्रपटाच्या प्रीमियरला उपस्थित राहत नसे. १९४७ साली आलेल्या निलकमल या चित्रपटात ती पहिल्यांदा अभिनेत्री म्हणून झळकली. याच वर्षी तिचा आणखी एक चित्रपट रिलीज झाला. पुढच्या वर्षी म्हणजे १९४८ साली तिचा अमर प्रेम नावाचा चित्रपट आला या सर्व चित्रपटात राज कपूर हे तिचे नायक होते. यानंतर बॉम्बे टॉकीजचा महल नावाचा चित्रपट आला हा चित्रपट सुपर डुपर हिट ठरला. यानंतर मात्र मधुबाला यांनी मागे वळून पाहिले नाही. अशोक कुमार, दिलीपकुमार, देवानंद या त्या काळातील आघाडीच्या अभिनेत्यांसह तिने भूमिका केल्या. अल्पावधीतच त्या बॉलिवूडच्या आघाडीच्या अभिनेत्री बनल्या. त्यांनी आपल्या करियरमध्ये ६६ चित्रपटात भूमिका केल्या. बॉलिवूडचे पहिले सुपरस्टार दिलीपकुमार यांच्यावर त्या एकतर्फी प्रेम करत असत. मुघले आझम चित्रपटाच्या शूटिंगच्या दरम्यान त्यांनी दिलीपकुमार यांच्याशी लग्न करण्याची इच्छा बोलून दाखवली मात्र दिलीपकुमार यांनी लग्नास स्पष्ट नकार दिला. त्यानंतर त्यांनी गायक किशोरकुमार यांच्याशी विवाह केला. मधुबाला या किशोरकुमार यांच्या चौथ्या पत्नी होत्या. किशोरकुमार यांच्या बरोबरचे लग्न ही बाब दोघांसाठी कसेतरी जगण्यासाठी केलेली तडजोड होती त्यामुळेच दोघांचे जास्त पटत नसे. मधुबाला यांना हृदय रोग होता आणि १९५० पासून त्यांच्यावर उपचार चालू होते. पण तिने ही गोष्ट सर्वांपासून लपवून ठेवली होती. तिची तब्येत बरी नसतानाही त्यांनी निर्माते दिग्दर्शकांचे नुकसान होऊ नये म्हणून साइन केलेले चित्रपट पूर्ण केले. या चित्रपटात असे कोठेही जाणवत नव्हते की त्या आजारी आहेत. हृदय रोगासोबत त्यांना असा एक आजार होता की ज्या आजाराने शरीरात प्रमाणापेक्षा अधिक रक्त तयार होत असे व तिच्या नाकातून व तोंडातून रक्तस्त्राव होत असे. इतक्या दुर्धर आजारातही तिने चित्रपटात काम करणे सुरूच ठेवले. मुघले आझम या चित्रपटातील एका दृश्यात तिला दोरखंडाने बांधले होते पण तिने तब्येत बरी नसतानाही ते सहन केले. ती म्हणायची अनारकलीची भूमिका करण्याची संधी पुन्हा मिळणार नाही. ती इतकी प्रोफेशनल होती की आपले काम अतिशय तन्मयतेने करत असत. प्रसंगी जेवण झाले नाही तरी चालेल, थर्ड क्लासने प्रवास करावा लागला तरी चालेल पण काम वेळेच्या वेळी पूर्ण करण्याचा तिचा आग्रह असे. तिच्या याच कामाच्या निष्ठेमुळे ती महान अभिनेत्री बनली. अमेरिकेच्या थिएटर आर्टस या जगप्रसिद्ध मासिकेने तिचा जगातील सर्वात मोठी अभिनेत्री म्हणून गौरव केला होता. तिच्या सौंदर्याची जादूच अशी होती की बघणारा हरखून जायचा. पण हेच आरस्पानी सौंदर्य तिच्यासाठी मात्र शापित ठरले. वयाच्या अवघ्या ३६ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. २३ फेब्रुवारी १९६९ साली त्यांनी जगाचा निरोप घेतला. मधुबालाला व्हीनस ऑफ स्क्रीन असे म्हटले जाते मात्र तिच्या याच आरस्पानी सौंदर्याला अल्पायुष्याचा शाप होता. आज त्या जाऊन ५७ वर्ष झाले मात्र तिच्या सौंदर्याची आणि अभिनयाची जादू आजही कायम आहे. सौंदर्याची खाण बॉलिवूडची शान असलेल्या मधुबाला यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

## हुंडा समाजाला लागलेली मोठी कीड अतिथी व्याख्यानात मान्यवरांचे प्रतिपादन

बीड (प्रतिनिधी)हुंडा ही केवळ एक प्रथा नसून आपल्या समाजाच्या प्रगतीला लागलेली मोठी कीड आहे. ही प्रथा मुळापासून उखडून टाकण्यासाठी केवळ कायद्याची भीती पुरेशी नसून, तरुण पिढीने वैचारिक प्रगल्भता दाखवणे काळाची गरज आहे, असे परखड मत प्रसिद्ध व्याख्याते प्रा. डॉ. सुनंदा आहेर यांनी व्यक्त केले.येथील सौ. के.एस.के. महाविद्यालयामध्ये आयोजित 'हुंडा पद्धत: समाजाला लागलेली कीड' या विषयावरील विशेष व्याख्यानात त्या बोलत होत्या. पूर्वी 'स्त्रीधन' म्हणून ओळखली जाणारी ही पद्धत आता हक्काने मागितली जाणारी 'खंडणी' झाली असल्याचे त्यांनी नमूद केले. स्त्री-पुरुष समानता: जोपर्यंत मुलीला दुय्यम आणि मुलाला 'विक्रीची वस्तू' मानणे थांबत नाही, तोपर्यंत ही प्रथा संपणार नाही.उपस्थितांना आवाहन करताना त्या म्हणाल्या की, लग्नात हुंडा न घेण्याची शपथ तरुणांनी घेतली पाहिजे आणि पालकांनीही मुलाच्या शिक्षणाचा 'व्यापार' करणे थांबवले पाहिजे. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. संजय पाटील देवळाणकर हे म्हणाले की, हुंडाबळी आणि हुंड्यामुळे कर्जबाजारी होणारी कुटुंबे यांची हृदयद्रावक उदाहरणे देण्यात आली. केवळ कायदे करून समाज बदलत नाही, तर त्यासाठी लोकचळवळ उभी राहणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी मांडले. ज्या दिवशी वधू-वरांचे गुण पाहून लग्ने ठरतील आणि पैशांचे पाकीट पाहून नाही, त्या दिवशी आपला समाज खऱ्या अर्थाने सुसंस्कृत होईल. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन डॉ. यादव घोडके यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. शितल हिरवे यांनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्त्र कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्रा.सनी विष्णू वाघमारे यांची मागणी

# शिवजयंती व डॉ.आंबेडकर जयंतीच्या पूर्वसंध्येला पुतळ्याची रंगरंगोटी करावी

बीड दि १३(प्रतिनिधी)- छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती १९ फेब्रुवारी व १४ एप्रिल रोजी जयंती असून देशभरात हा उत्सव अनुयायी साजरा करतात. छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती काही दिवसावर येऊन ठेपली आहे या अनुषंगाने बीड नगर परिषद मुख्याधिकारी फडसे सरांनी बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची रंगरंगोटी करण्याचे आदेश द्यावेत. तसेच १४




एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती निमित्त शहरातील विविध भागांमध्ये असणाऱ्या बौद्ध विहाराची रंगरंगोटी करण्यात यावी. अशी मागणी प्रा सनी विष्णू वाघमारे यांनी केली असून या संदर्भात मुख्याधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन देणार असल्याचेही पत्रकात नमूद केले आहे.

# कागदी वेस बौद्ध नगर समाज मंदिर दुरुस्तीची रवी वडमारे यांची मागणी



बीड दि १३ (प्रतिनिधी)- शहरात आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवले जात असताना कागदी वेस बौद्ध नगर येथील समाज मंदिराकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप होत असून स्थानिक नागरिकांनी समाज मंदिराच्या जीर्ण अवस्थेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. कागदी वेळेस बौद्ध नगर समाज मंदिर दुरुस्तीची मागणी रवी वडमारे यांनी केली आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित समाज मंदिर अनेक वर्षांपासून दुरवस्थेत आहे. इमारतीची दुरुस्ती, आतील सुविधा, स्वच्छता आणि संरक्षक कामे याकडे गांभीर्याने लक्ष दिले गेलेले नाही. दरवर्षी निधी मंजूर होतो; मात्र प्रत्यक्षात केवळ रंगरंगोटी किंवा किरकोळ कामे दाखवून खर्च दाखवला जात असल्याचा आरोपही नागरिकांकडून केला जात आहे. या पार्श्वभूमीवर समाजसेवक रवी वाघमारे यांनी मुख्य अधिकाऱ्यांकडे कळकळीची मागणी नोंदवली आहे. समाज मंदिराचे तात्काळ रिपेरिंग करून आवश्यक त्या ठिकाणी दर्जेदार पेंटिंग व इतर विकासकामे करण्यात यावीत, तसेच यासाठी संबंधित विभागाला स्पष्ट आदेश द्यावेत, अशी मागणी त्यांनी समाजाच्या वतीने केली आहे.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत जखमी झालेल्या हरणाला डॉ.ढवळे यांनी दिले वनरक्षक महेश मेटे यांच्या ताब्यात



लिंबागणेश दि १३(प्रतिनिधी) - बीड तालुक्यातील बालाघाट परिसरातील मुळुकवाडी शिवारातील लक्ष्मणनगर वस्तीवर शेतकरी देविदास लिंबराज पांचाळ यांच्या शेतात गुरुवारी दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास एक हरीण जखमी अवस्थेत आढळून आले.घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे व पत्रकार हरिओम क्षीरसागर यांनी घटनास्थळी जावून जखमी हरणाला पाणी पाजून प्राथमिक उपचार केले. त्यानंतर वनरक्षक महेश मेटे यांच्याशी संपर्क साधून वनविभागाच्या ताब्यात देण्यात आली मांजरसुंभा ते पाटोदा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी मार्गावर रक्ताचे डाग आढळून आल्याने अज्ञात वाहनाच्या धडकेत हरीण जखमी झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. वनविभागाचे वनरक्षक महेश मेटे व वनकर्मचारी अनिल शेळके यांच्या ताब्यात जखमी हरीण देण्यात आले असून पुढील उपचारासाठी शिरूर कासार तालुक्यातील सिद्धार्थ सोनावणे यांच्या सर्पराज्ञी वन्यप्राणी प्रकल्पात हलविण्यात आले.दरम्यान, राष्ट्रीय महामार्गावर रात्रीच्या वेळी वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे वन्यप्राण्यांच या जिवितास गंभीर धोका निर्माण होत आहे. महामार्ग ५४८ डी वर वारंवार अशा अपघातांच्या घटना घडत असल्याने संबंधित ठिकाणी सावधानतेचे फलक लावण्यात यावेत, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे आणि पत्रकार हरिओम क्षीरसागर यांनी केली आहे.

# लोक क्रांती युवासेना गेवराई तालुकाध्यक्षपदी सुनिल मिसाळ यांची निवड



गेवराई दि.१३ (प्रतिनिधी) :- बीड येथील विश्रामगृह येथे आयोजित केलेल्या एका कार्यक्रमामध्ये लोक क्रांती युवासेना गेवराई तालुकाध्यक्षपदी सुनिल दत्तोपंत मिसाळ तर गेवराई शहर प्रमुख पदी राम कैलासराव रोकडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. बीड जिल्ह्यातील विविध पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते त्याठिकाणी उपस्थित होते. लोक क्रांती युवासेना कार्यकारिणी जाहीर झाल्याने सर्व उमेदवारांनी लोक क्रांती सेनेचे नाव व काम जोमाने पुढे नेऊ असे आश्वासन दिले. याठिकाणी लोक क्रांती सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष राहुल बांगर हे देखील उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमध्ये नियुक्तीपत्र देण्यात आले. बीड जिल्हाध्यक्ष राहुल बांगर यांनी पक्ष वाढीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी गेवराई तालुकाध्यक्षपदी सुनिल मिसाळ यांची नियुक्ती पत्र देऊन निवड करण्यात आली. तसेच गेवराई शहर प्रमुखपदी राम रोकडे यांची निवड करण्यात आली. यावेळी लोक क्रांती युवासेनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी जय क्रांती या नावाचा जय घोष केला.

# महाशिवरात्री निमित्त राजापूरात अखंड हरिनाम सप्ताह व गंगाआरतीचे आयोजन



गेवराई दि.१३ (प्रतिनिधी) :- गोदाकाठी असलेल्या राजापूर येथे महाशिवरात्री निमित्त राजेश्वर महादेवाच्या मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह व गंगाआरतीचे आयोजन करण्यात आले आहे. मौजे राजापूर येथे गोदावरी नदीकाठावर राजेश्वर महादेवाचे पुरातन हेमाडपंथी मंदिर आहे. जागृत देवस्थान असलेल्या या मंदिराचा नामोल्लेख अनेक ग्रंथात आलेला असून महाशिवरात्री निमित्ताने गावकऱ्यांनी विविध कार्यक्रमाचे आयोजन केले असून अखंड हरिनाम सप्ताहात शिवरात्रीला गोदावरी नदीवरील घाटावर गंगा आरतीचे आयोजन करण्यात आलेले आहे. सोमवार दि.९ फेब्रुवारी पासून अखंड हरिनाम सप्ताह उत्साहात सुरू असून सोमवार दि.१६ फेब्रुवारी रोजी काल्याच्या किर्तनाने सांगता होणार आहे. या सप्ताहात भागवत कथेचेही आयोजन केलेले असून कै.हनुमान उबाळे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ उबाळे परिवाराच्या सौजन्याने माजलगांवचे मार्तंडशास्त्री यांच्या अमृततुल्य वाणीतून कथा सुरू आहे. या कार्यक्रमात गाथा भजन, हरिपाठ, शिवलिलामृत पारायण यासह दररोज रात्री किर्तनाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सोमवार दि.१६ फेब्रुवारी रोजी ह.भ.प.भागवत महाराज दोबोले (घुंगर्डे हदगाव) यांचे काल्याचे किर्तन व त्यानंतर महाप्रसाद वाटप करून कार्यक्रमाची सांगता होणार आहे. या सप्ताहात काल्याच्या महाप्रसादाचे यजमान सार्थक उबाळे, भाऊसाहेब देवकते, अच्युत पुरी व चंद्रकांत पुरी हे असणार आहेत. काशीसह बनारस ला होणार्या गंगाआरतीप्रमाणेच राजापूर येथे पवित्र गोदावरी नदीची आरती होणार असून या आरतीचे परिसरासह तालुक्यात आकर्षण आहे. महाशिवरात्रीच्या दिवशी हेमाडपंथी घाटावर ब्रम्हवृंदाच्या मंत्रोच्चारात गावकऱ्यांच्या उपस्थितीत हि आरती होणार असून आरतीद्वारे गोदावरीचे पूजन होऊन तिच्याप्रती आदर व आभार व्यक्त करण्याचा गावकर्यांचा माणस आहे. या आरतीसाठी विविध ठिकाणांवरून भाविक हजेरी लावणार असून भाटेपूरी संस्थानचे ह.भ.प.भगवंत महाराज पुरी हेही यावेळी उपस्थिती दर्शविणार आहेत. आरतीचे पौरोहित्य राजापूरातील व बाहेर वास्तव्यास असणारे सर्व भुमिपूत्र ब्राम्हणवृंद करणार आहेत.

## अनिलशेठ काथवटे यांच्या पनवेल ड्रीम घर प्रोजेक्ट कार्यालयाचा आ.धस यांच्या



डोंगरकिन्ही दि १३ (प्रतिनिधी) -पाटोदा तालुक्यातील डोंगरकिन्ही येथील अनिलशेठ काथवटे यांनी बांधकाम क्षेत्रात भरारी घेतली असून नुकताच त्यांच्या पनवेल येथे ड्रीम घर प्रोजेक्ट कार्यालयाचा शुभारंभ आ.सुरेशआण्णा धस यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. याप्रसंगी आ.प्रशांतजी ठाकूर शिवराज पाटील एस पी ठाणे, सलमान शेख आय आर एस ,नेहा निकम आय आर एस ,जि प सदस्य अतुलशेठ घरत, बारगजे नगरसेवक ,विशाल बडे , भागिदार काझी रफीक झकीऊद्दीन , शेख जमील, श्रीनिवास राठोड , नूर इस्लाम यांची उपस्थिती होती.काथवटे यांची आ.धस यांचे कट्टर समर्थक म्हणून आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यात ओळख आहे. राजकारणासोबत , समाजकारण करत त्यांनी आजवर अनेकांना रोजगार दिला असून, अनेकांना व्यवसायात स्वतःच्या पायावर उभे केले आहे. हे करत असताना त्यांनी बांधकाम उद्योग क्षेत्रातील संधी ओळखत मोठा उद्योजक होण्याचे स्वप्न पाहीले. याचेच फलित गेल्या वर्षी त्यांना मुंबई मधील वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे झी मीडियाच्या वतीने यशस्वी स्टार्ट अप म्हणून उद्योगरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. त्याही पुढे जात त्यांनी सहकारी काझी रफीक झकीऊद्दीन , शेख जमील, श्रीनिवास राठोड , नूर इस्लाम यांच्या जोडीने पनवेल येथे ड्रीम घर प्रोजेक्ट कार्यालयाचा शुभारंभ केला. कार्यक्रम प्रसंगी अनिल काथवटे व त्यांचे सर्व सहकारी हे अतिशय इमानदारीने प्रामाणिक काम करणारे कार्यकर्ते आहेत.

# किट्टी आडगाव येथे शिव महापुराण कथा



किट्टी आडगाव दि १३( प्रतिनिधी )- माजलगाव तालुक्यातील किट्टी आडगाव आयोजन आणि संयोजन समस्त महिला मंडळ,समस्त ग्रामस्थ मंडळ, आणि नवतरुण मित्र मंडळ आयोजित श्री शिव महापुराण कथेचा सोमवार दि. ९ रोजी प्रारंभ झाला तसे या कथेची सांगता सोमवार दिनांक १६ फेब्रुवारी रोजी होणार आहे.

शिव कृपांकित ह. भ. प. अंकिता ताई खांडगे ( कल्याण स्वामी संस्थान चकलंबा श्रीक्षेत्र अल्हानवाडी) यांचे रंगीत संगीत कथा वाचन दुपारी दोन ते सहा या वेळेत महाशिवरात्री निमित्त चालू असून हे तिसरे वर्ष आहे. सोहळ्याच्या चौथ्या दिवशी महिलांची उपस्थिती नेहमीप्रमाणे लक्षणीय होती. अंकिता ताई यांनी भगवान महादेवाच्या शक्तीवर प्रकाश टाकला.उद्बोधन करताना ह. भ. प. अंकिता ताई खांडगे म्हणाल्या, जन्ममृत्यूच या चक्रातून आपल्याला मुक्त व्हायचं असेल, तर शिवभक्ती शिवाय पर्याय नाही. नातलग आपल्या सुखात सोबत असतात, तर देवदूत आपल्याला दुःखा च्या वेळी साथ देतात, म्हणून ईश्वर भक्ती करा असे सांगताना अंकिता ताई खांडगे पशुपती व्रताचे महत्व विशद केले.

# तांदळेश्वर विद्यालयामध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ संपन्न



बीड दि १३ (प्रतिनिधी)- तालुक्यातील तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाट या शाळेमध्ये मुख्याध्यापक शाम डाके यांच्या अध्यक्षतेखाली इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कसबे महादेव नेमाजी सर संपादक सोमनाथ पाटील, प्रशांत बंडू खोसे, शालेय समिती अध्यक्ष जिल्हा परिषद शाळा तांदळवाडी घाट , सरपंच बळीराम शिरसाट, अंधापुरीचे सरपंच पप्पू जगताप तांदळवाडी चे उपसरपंच महादेव अण्णा खोसे ग्रामपंचायत सदस्य अनिल खोसे ग्रा प सदस्य खोसे रामहरी दादा भागडे ग्राप रोजगार सेवक इत्यादी मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी स्वागत गीत गाऊन मान्यवरां चे स्वागत केले त्यानंतर दोन सामुदायिक डान्सचे गाणे घेण्यात आले सर्व मान्यवरांनी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. यावेळी इयत्ता आठवी नववी दहावी विद्यार्थी विद्यार्थिनीचे मनोगत व्यक्त केले तर दत्ता जाधव या विद्यार्थ्याला स्टुडन्ट ऑफ द इयर हा पुरस्कार मान्यवरां च्या हस्ते देण्यात आला . तर उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याबरोबरच परीक्षे साठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रस्ताविक काशीद सर यांनी केले कार्यक्रमाचे आभार पवार सर् व लहाने सर यांनी मानले

# द्वा.मंत्री राजस्थानी विद्यालयात दहावीचा शुभेच्छा समारंभ संपन्न



बीड दि.१३ (प्रतिनिधी)- येथील द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालयामध्ये , इयत्ता १० वी च्या, विद्यार्थ्यांचा शुभेच्छा समारंभ संपन्न झाला यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष विष्णुदास तापडिया,प्रमुख अतिथी सचिव रामेश्वर कासट,मुख्याध्यापक लाहोटी सर, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक सोहनी सर, उपमुख्याध्यापक हावळे सर, पर्यवेक्षक मालपाणी सर उपस्थित होते. आपल्या प्रास्ताविकातून मुख्याध्यापक लाहोटी सर यांनी विद्यालयातील विविध उपक्रम, अध्ययन अध्यापन व यशाच्या परंपरेविषयी सखोल माहिती देत अनमोल असे मार्गदर्शन केले . तसेच इयत्ता १० वी तिल चि. यश शिंदे, कु आस्था सोहनी, कु.योगेश्वरी देशमुख, कु.निकिता पाटील यांनी आपल्या मनोगतातून अनेक आठवणींना उजाळा दिला यावेळी त्यांच्या भावना अनावर झाल्या होत्या. सहशिक्षक तळेकर जी. बी. म्हणाले की विद्यार्थी हा विशिष्ट ध्येयाकडे वाटचाल करणारा असावा, स्वतःच्या नावाबरोबर आपल्या कुटुंबाचे, आपल्या विद्यालयाचे , आपल्या देशाचे नाव उंचवावे हे करत असताना संस्कारक्षम जीवन जगावे असे आवर्जून नमूद केले. पर्यवेक्षक मालपाणी सर म्हणाले की विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात शिस्त, संस्कार, नैतिक मूल्य, सदवर्तन यांचे नेहमीच जतन करावे, विद्यार्थी आणि शिक्षक यांचे अतूट नाते असते तसेच विद्यार्थ्यांन बद्दल शिक्षकांना असणारी नितांत तळमळ उदाहरणांच्या माध्यमातून समजावून सांगितली. प्रमुख अतिथी संसंस्थे चे सचिव रामेश्वर कासटयांनी उदाहरणाच्या माध्यमातून ठरवलेले ध्येय प्राप्त करे पर्यंत मागे वळून पाहू नका असा मोलाचा सल्ला देत येणाऱ्या परीक्षेसाठी व आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष विष्णुदास तापडिया यांनी अध्यक्षीय समारोपात विद्यार्थी हा शिस्तप्रिय असावा, तो कृतज्ञ असावा, संस्काराची जोपासना करणारा असावा, सतत परिश्रमपूर्वक ज्ञान मिळवणारा असावा व त्याच्याकडे संशोधक वृत्ती असावी आणि विकासाच्या वाटेने वाटचाल करणारा असावा अशी भावना व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. कला शिक्षक वाघमारे सर यांनी सादर केलेल्या प्रासंगिक गीताने वातावरण अतिशय भावुक झाले होते. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. औटी मॅडम यांनी केले तर आभार उपमुख्याध्यापक हावळे सर यांनी मानले.

# सकारात्मकता व सृजनशीलता या भावना एआय देवु शकणार नाही; साहित्यिक प्रभाकर साळेगावकर यांचे प्रतिपादन



माजलगाव दि.१३(प्रतिनिधी)- सकारात्मकता आणि सृजनशीलता या एकत्रित भावनिक शक्ती आपणांस वैचारिक उंची देतात.सभोवताली विमनस्कता असताना विचलित न होणे ही सकारात्मकता असते तर सकारात्मकतेतील कल्पनाशक्ती ही सृजनशीलता असते . नवनिर्मिती हे शिक्षणाचे सर्वोच्च मुल्य आहे. आपण स्वतःला ओळखणे महत्वाचे आहे. मानवीय भावना कृत्रिम असु शकत नाहीत म्हणून सकारात्मक व सृजनशीलता एआय देवु शकत नाही. असे विचार साहित्यिक प्रभाकर साळेगावकर यांनी नवविकास मंडळाच्या नरहर कुरूंदकर व्याख्यानमालेत सकारात्मकता व सृजनशीलता या विषयावर बोलताना व्यक्त केले.माजी शिक्षक आमदार डी. के. देशमुख यांच्या अध्यक्षतेत झालेल्या व्याखानाच्या व्यासपिठावर ॲड.एस.आर.शर्मा , संतोष मुळी , हिमांशु देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रतिमा पूजन आणि प्रार्थने नंतर संपादक व संस्थेचे संचालक शिरीष देशमुख यांनी लक्षवेधी प्रास्ताविक केले. ८६ व्या वाढदिवसानिमित्त ॲड एस आर शर्मा यांचा आणि व्याख्याते साळेगावकर यांचा नवविकास मंडळा तर्फे मा. आ. डी. के. देशमुख यांच्या हस्ते सत्कार संपन्न झाला. अनंत सभागृहात अमरनाथ खुर्पे ,आर. बी. देशमुख , डॉ.अंगद गायकवाड,डॉ.सचिन देशमुख ,डॉ.स्वानंद कुलकर्णी, शुभांगी देशमुख,मोहन राठोड ,रामदीप डाके,सुहास देशमुख,लांडगे सर , गायिका अंजली मुळे , व्हि एन कुलकर्णी, अंजिराम भोसले , लता जोशी , जे. पी कुलकर्णी, विजय ठोसर ,सुधीर देशमुख , डॉ.जुजगर , बी. एस. देशपांडे , पी. के. देशमुख , राजाभाऊ शिवणकर , सिद्धी जोशी , संदीकर दामोदर , प्रतिभा देशमुख , निला देशमुख , डॉ. निळेकर ,सुलभाताई देशमुख, ग. वा. मुळाटे , मसलेकर मोरेश्वर यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित होते. ओघवते सुत्रसंचालन हिमांशु प्रदिप देशमुख यांनी केले तर आभार मुख्य प्रशासकीय अधिकारी अभिमन्यु ईबिते यांनी मानले. ज्योती दायमा ने गायिलेल्या पसायदानाने व्याख्यानमालेची सांगाता झाली.

# आमदार सुरेश धस यांच्या निर्णायक पाठपुराव्यामुळे ऊसतोड कामगारांच्या पाल्यांच्या शिक्षणात नवी पहाट

## पाटोद्यात राष्ट्रसंत भगवान बाबा वस्तीगृहांसाठी शासनाकडून हिरवा कंदील

पाटोदा दि.१३ (महेश बेदरे)- पाटोदा तालुक्यातील स्थलांतरित ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींच्या शिक्षणाचा दीर्घकालीन प्रश्न अखेर मार्गी लागला असून आमदार सुरेश धस यांच्या सातत्यपूर्ण आणि ठाम पाठपुराव्यामुळे पाटोद्यात संत भगवानबाबा शासकीय मुलांचे व मुलींचे स्वतंत्र वसतिगृह उभारण्यास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. बीड जिल्ह्यातील ११ वसतिगृहांसाठी एकूण रुपये १५९.३६ कोटींच्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात आली असून त्यापैकी पाटोदा येथील दोन वसतिगृहांसाठी प्रत्येकी रुपये १४.४७ कोटी निधी मंजूर झाला आहे. प्रत्येक वसतिगृहाची क्षमता १०० विद्यार्थ्यांची आहे.

पाटोदा तालुक्यातील ग्रामीण भागातील सुमारे ६० ते ७० टक्के ऊसतोड मजूर दरवर्षी राज्यात व परराज्यात स्थलांतरित होतात. पालक स्थलांतरित झाल्यानंतर त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणाचा प्रश्न गंभीर बनतो. हंगामी वसतिगृहांच्या बदलत्या नियमावलीमुळे मागील काही वर्षांत काही ठिकाणी वसतिगृह



सुरू झाले नाहीत. परिणामी अनेक विद्यार्थ्यांचे शिक्षण अर्धवट राहिले, शाळा बदलण्याची वेळ आली किंवा काहींची शैक्षणिक साखळी तुटण्याचा धोका निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर आमदार सुरेश धस यांनी हा विषय प्राधान्याने हाती घेतला. मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री मा. ना. श्री. संजयजी शिरसाठ यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करत पाटोदा हे मध्यवर्ती ठिकाण असल्याने वसतिगृह शहराच्या हद्दीतच उभारण्यात यावेत, अशी ठाम भूमिका आमदार धस यांनी मांडली होती. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळत ही दोन्ही वसतिगृह पाटोदा शहरातील सामाजिक वसतिगृहांच्या शेजारील सुमारे चार एकर गायरान शासकीय जमिनीवर उभारण्यात येणार आहेत. मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र, सुरक्षित आणि सुसज्ज अशा १००-१०० क्षमतेच्या इमारती उभारल्या जाणार असल्यामुळे ऊसतोड कामगारांच्या पाल्यांना सातत्यपूर्ण व दर्जेदार शिक्षणाची संधी मिळणार आहे. विशेषतः मुलींच्या शिक्षणासाठी हा निर्णय परिवर्तनकारी ठरणार असून ग्रामीण भागातील कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या १५० व्या जयंतीच्या अध्यक्षपदी संजय साळुंके, उपाध्यक्षपदी नितीन नवले तर सचिवपदी महेंद्र वाघमारे यांची निवड







बीड दि.१३ (प्रतिनिधी):- राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या १५० व्या सार्वजनिक जयंतीच्या निमित्ताने राष्ट्रसंत गाडगे महाराज सांस्कृतीक सभागृह, मोंढा रोड, बीड येथे दि.८ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १.०० वाजता कार्यकारिणी बैठक आयोजित करण्यात आली.

बैठकीची सुरुवात राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन करून करण्यात आली. यानंतर महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करून जयंतीच्या कार्यक्रमाची रूपरेषा ठरविण्यात आली. या बैठकीत मार्गदर्शन केले बीड जिल्हा कार्याध्यक्ष रमेश घोडके, रवी जाधव, विलास जाधव आणि गणेश राऊत यांनी. बैठकीचे अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य परिट धोबी समाजसेवा मंडळाचे बीड जिल्हा अध्यक्ष ॲड. सुधीर जाधव इत्यादींच्या उपस्थितीत तसेच बीड जिल्हा सचिव प्रवीण साळुंके, जिल्हा उपाध्यक्ष जिजा शिंदे, मराठवाडा विभागीय उपाध्यक्ष संतोष पवार, शहर उपाध्यक्ष शितल राऊत, युवक शहराध्यक्ष मंगेश घोडके, शहर कार्याध्यक्ष संतोष भालेकर आदी उपस्थित होते.

कार्यकारिणीची निवडीचे स्वागत केली असून अध्यक्षपदी संजय साळुंके, उपाध्यक्षपदी नितीन नवले आणि सचिवपदी महेंद्र वाघमारे यांची निवड करण्यात आली आहे. सदर निवडीचे स्वागत राज्य कार्याध्यक्ष गणेश जगताप, बीड शिवसेना उपजिल्हाप्रमुख अजय जाधव, शहराध्यक्ष अंबादास नवले, जगन्नाथ शिंदे, जयंत राऊत, प्रकाश जाधव, संजय नवले, मनोज वाघमारे, युवक सेवा सचिव अतुल साळुंके, प्रा.विजय जाधव, संदीप जाधव, अमोल काळे, मनोज नवले, गणेश धोंगडे, नितीन नवले इत्यादींनी पुढील कार्यास शुभेच्छा देवून स्वागत केले.

तसेच दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सोमवार दुपारी ५.०० वाजता मोठ्या थाटात मिरवणूक काढण्याचे कार्यक्रम ठरविले आहे. मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून सुरू होणार आहे. मिरवणुकीचा मार्ग छत्रपती शिवाजी महाराज चौक - बशीरगंज - राजुरी वेस - कारंजा - बलभीम चौक - धोंडीपुरा - माळीवेस मार्गाने जाऊन राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या पुतळ्याजवळ येऊन अभिवादन करून महाप्रसादांसह समारोप होणार आहे. सर्व समाजबांधव व गाडगेबाबा प्रेमींनी या कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्साहवर्धक सहभाग दर्शवावा, असे आयोजकांनी आवाहन केले आहे.

# दडपण न घेता आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जा– मुख्याध्यापक वाघमारे

## श्री शिवाजी विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

बीड दि.१३ (प्रतिनिधी)- कुठल्याही प्रकारचे दडपण न घेता सकारात्मक विचार ठेवून विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जावे, असे आवाहन मुख्याध्यापक राजेंद्र वाघमारे यांनी केले.

श्री शिवाजी विद्यालयाच्या प्रांगणात गुरुवार १२ फेब्रुवारी रोजी सकाळी दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित शुभेच्छा अर्थात निरोप समारंभ प्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलताना राजेंद्र वाघमारे यांनी परीक्षेला जाताना विद्यार्थ्यांनी पंधरा मिनिट अगोदर निघावे वेळेत परीक्षा केंद्रावर पोहोचून शांत मनाने पेपर सोडवावा. पेपर सोडवताना काळजी घ्यावयाच्या बारीक सारी गोष्टी त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना सांगितल्या. पेपर झाल्यानंतर त्याचे मूल्यमापन करण्याऐवजी पुढच्या पेपरची तयारी करावी. पेपर सोपा गेला-अवघड गेला याचे दडपण न घेता पुढील पेपरची तयारी करावी. परीक्षा संपेपर्यंत आत्मविश्वास धळू देऊ नका. कॉपीचा आधार घेऊ नका. कठोर मेहनत घ्या.यश तुम्हाला मिळाल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. यावेळी अध्यक्षस्थानी प्राचार्य त्र्यंबक मातकर, प्रमुख पाहुणे म्हणून पांडुरंग थोरात साहेब (वरिष्ठ लेखाअधिकारी,शिक्षण विभाग बीड), उप मुख्याध्यापक डी.एन.करडीले, पर्यवेक्षक एच.आर.सावंत, पर्यवेक्षक गिरीश चाळक, दहावीचे वर्गशिक्षक श्रीराम तागड, राजेंद्र भावसार, अजय चव्हाण, विनोद डंबरे, डॉ.महेश वाघमारे, श्रीमती गयाबाई नाईकवाडे, श्रीमती वर्षा गिराम यांची उपस्थिती होती. यावेळी पांडुरंग थोरात यांनी बोलताना सांगितले की,विद्यार्थ्यांनी चांगल्या प्रकारचे वर्गात श्रवण केले पाहिजे. त्यामुळे बुद्धीचा विकास होतो. विचार प्रगल्भ बनतात आणि विद्यार्थी चांगला घडतो हे सांगून त्यांनी ध्येय ठेवून विद्यार्थ्यांनी मार्गक्रमण केले पाहिजे. शारीरिक, मानसिक तंदुरुस्ती राखण्यासाठी उत्तम आहार, विहार ठेवला पाहिजे,असे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोपात त्र्यंबक मातकर यांनी विद्यार्थ्यांनी चांगली संगत ठेवली पाहिजे. आई-वडिलांवर प्रेम करणारे कधी वाईट वागत नाहीत हे सांगून त्यांनी वडिलांवरची माया गीतातून सांगितली. मित्र कसा असावा हे त्यांनी मित्र वनव्यामध्ये गारव्यासारख्या या गीतातून सांगितले. कार्यक्रमाच्या प्रारंभी रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज व संस्थेचे संस्थापक कै. बळवंतराव कदम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमात दहावीच्या सराव परीक्षेत ९०% च्या वर गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ व बक्षीस देऊन पाहुण्यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे बहारदार संचलन व आभार प्रदर्शन एच. आर. सावंत यांनी केले. शाळेप्रती १० वी विद्यार्थी बाळू शेळके, वेदांगी साळुंके, श्रावणी काकडे, शितल गव्हाणे, श्रावणी जुळे, चिन्मयी घोडके, आयुष आगलावे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. शाळेतील ९ वी वर्गातील विद्यार्थ्यांच्यावतीने १० वीच्या विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून निरोप देण्यात आला.

# जामखेड शहरातील राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमणाबाबत नगरपरिषद ॲक्शन मोडवर

जामखेड (प्रतिनिधी) : जिल्ह्यातील व परिसरातील सर्व अतिक्रमणे काढण्यात आली फक्त जामखेड शहरातील लहान मोठे अतिक्रमणे काढली पण मोठे मोठे अतिक्रमणे तसेच आहेत याबाबत अवधूत पवार यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले होते. राष्ट्रवादी काँग्रेसने अतिक्रमण हटण्यासाठी उपोषण आंदोलन केले होते. शहरातील अतिक्रमणे न हटवता राष्ट्रीय महामार्ग रस्ता सुरू करण्यात आला तसेच गटारावर टपऱ्या बांधून भाड्याने दिलेले आहेत. शहरातील पाईपलाईन कोठून जाणार असा प्रश्न निर्माण झाला होता. आता नगरपरिषद जामखेड यांनी अतिक्रमण धारकांना नोटीसा बजावले आहेत नोटीस मिळाल्यापासून सात(७) दिवसात अतिक्रमण काढून घ्यावेत अन्यथा अतिक्रमण हटविण्याचा खर्च संबंधित अतिक्रमण धारकांना करावा लागेल यामुळे अतिक्रमण धारकांचे धाबे दणाणले आहेत आता अतिक्रमण निघणार का हे पाहणे आवश्यक आहे.

जामखेड शहराच्या हद्दीतून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी वरील जामखेड ते सौताडा या रस्त्याच्या हद्दीत तथा रस्ता लगत नगरपरिषद कार्यालयाची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता नियमबाह्य बांधकाम /अतिक्रमण केलेले आहे. जामखेड ते सौताडा रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी हा रस्ता जामखेड शहराच्या हद्दीतून जात असून हा रस्ता शहराच्या विकास योजना रस्ते मध्ये समाविष्ट आहे तसेच नगरपरिषद हद्दीत पाणीपुरवठा योजना व भुयारी गटार योजनेचे काम चालू होणार आहे



जामखेड ते सौताडा रस्ता राष्ट्रीय महामार्ग लगत दोन्ही बाजूच्या स्टॉर्म वॉटर लाईन (नाली) पासून तीन मीटरच्या अंतर्गत येणारे सर्व बांधकाम अनधिकृत असून कार्यालयाची कोणती पूर्व परवानगी न घेता नियमबाह्य बांधकाम/ अतिक्रमण केलेले आहे. तरी सदरचे अदनाधिकृत नियमबाह्य बांधकाम ही नोटीस मिळाल्यापासून सात(७) दिवसाच्या आत काढून घ्यावे व संबंधित कार्यान्वयन यंत्रणेला यथोचित सहकार्य करावे अन्यथा सदर रस्ता विकसित करणाऱ्या संबंधित यंत्रणेमार्फत सदरचे बांधकाम काढण्यात येईल आणि त्याचा खर्च आपणाकडून वसूल केला जाईल व आपल्या होणाऱ्या नुकसानीस आपण स्वतः जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी असे नोटीस मध्ये म्हटले आहे.

## सोन्या–चांदीच्या दरातील उलथापालथ केव्हा थांबणार ?

सोन्या-चांदीच्या दरात गेल्या काही दिवसांपासून चढ-उतार पाहायला मिळत आहे. यासंबंधी तज्ज्ञांनी गुंतवणुकीचा एक पर्टन सांगितला आहे. ही उलथापालथ कधी थांबवणार यासंबंधी अंदाजही वर्तवला आहे.

सोने हे नेहमीच गुंतवणूकदारांसाठी सुरक्षित गुंतवणूक पर्याय होते. पण गेल्या वर्षभरात सोन्याच्या दरांत झालेली वाढ अधिक गुंतवणूकदारांना आकर्षित करत आहे. तर गेल्या वर्षापासून चांदी गुंतवणूकदारांसाठी एक आकर्षक पर्याय बनली आहे.

# पहाडी पारगाव सेवा.सोसायटीचेअरमन पदी आसाराम मुंडे तर व्हा.चेअरमनपदी सौ.सरस्वती नांदे यांची निवड



किल्लेधारुर (प्रतिनिधी) : धारूर तालुक्यातील पहाडी पारगाव येथील सेवा सहकारी सोसायटी ची चेअरमन पदाची निवडणूक माजलगाव मतदारसंघाचे आमदार प्रकाशदादा सोळंके व राष्ट्रवादी काँग्रेस चे जेष्ट नेते राजाभाऊ मुंडे यांच्या नेतृत्वा खाली बिनविरोध होऊन चेअरमन पदी आसाराम चत्रभुज मुंडे यांची निवड करण्यात आली तर व्हाईस चेअरमन म्हणून सौ. सरस्वती शाहूराव नांदे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. अध्यासी अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधक ऋषिकेश कातळे यांनी काम पाहीले तर तडसकर व सचिव विष्णू रंदवे यांनी सहकार्य केले. यावेळी सेवा सोसायटीचे सर्व संचालक, आजी माजी सरपंच, चेअरमन, राष्ट्रवादीचे कार्यकर्ते तसेच समस्थ गावकरी उपस्थित होते.

# जयभिम महोत्सव तयारीची बैठक

## समाज बांधवांननी उपस्थित राहण्याचे आवाहन

बीड (प्रतिनिधी) : महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या जयभीम महोत्सवाच्या तयारीला बीड शहरात सुरुवात झाली आहे. जयंती उत्सव २०२६ भव्य आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बीड येथे महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.दरवर्षीप्रमाणे यंदाही जयंती उत्सव सामाजिक एकात्मता, असा निर्धार आंबेडकरवादी बांधवांनी व्यक्त केला आहे. सदर बैठकीत मागील वर्षीच्या संयोजन समितीने राबविलेल्या विविध कार्यक्रमांचा तसेच खर्चाचा सविस्तर आढावा सादर करण्यात येणार असून, सार्वजनिक जयंती उत्सव संयोजन समिती २०२६ ची निवड करण्यात येणार आहे.या उत्सवात विविध घटकांचा सक्रिय सहभाग असतो. त्यामुळे यंदाच्या महोत्सवाचे नियोजन अधिक व्यापक आणि प्रभावी व्हावे, यासाठी सर्व आंबेडकरवादी अधिकारी, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच उपासक-उपासिका यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून बैठकीस सहकार्य करावे, असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.जयभीम महोत्सवाच्या अनुषंगाने शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, समाज बांधवांच्या सहभागातून यंदाचा उत्सव अधिक भव्य करण्याचा संकल्प व्यक्त केला जात आहे.

# शिवजयंती निमित्त रामनगरचा हरिनाम सप्ताहाचे आयोजन –शिवम महाराज साबळे

बीड (प्रतिनिधी) : लोक परिस्थिती पाहून वागतात आणि चांगले काम करणाऱ्यांवरही टीका करतात. मात्र लोकांनी नाव ठेवली म्हणून चांगले काम करणे सोडू नये, असा परखड संदेश हभप शिवम महाराज साबळे यांनी दिला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त रामनगर येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाच्या पहिल्या दिवशी ते कीर्तनसेवेत बोलत होते.

आज शिवजयंती सर्वत्र उत्साहात साजरी होत असली तरी काही ठिकाणी डीजेच्या तालावर व्यसनाधीन होऊन तरुणाई थिरकताना दिसते. मात्र अशी जयंती शिवरायांना अभिप्रेत नाही, असे स्पष्ट मत व्यक्त करत साबळे महाराज म्हणाले, सर्व जाती-धर्मांना सोबत घेऊन स्वराज्य उभे करणाऱ्या राजाची जयंती ही समाजप्रबोधनाची, संस्कारांची आणि एकतेची असावी. ती कशी असावी हे रामनगर ग्रामस्थांकडून शिकण्यासारखे आहे. रामनगर येथे मागील १४ वर्षांपासून शिवजयंतीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. विशेष म्हणजे हा उपक्रम आजची तरुण पिढी पुढाकार घेऊन यशस्वीपणे राबवत आहे.

शिवरायांना अभिप्रेत असा आध्यात्मिक आणि संस्कारमय उत्सव साजरा करण्याचा हा आदर्श इतरांनीही घ्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. या सप्ताहाच्या पहिल्या दिवशीची कीर्तन सेवा हभप शिवम महाराज साबळे यांची भावपूर्ण वातावरणात पार पडली. कार्यक्रमास शिवाजी महाराज नेवडे, आण्णा महाराज शेळके, निर्गुण महाराज गवंडे, परमेश्वर महाराज माने, रावसाहेब महाराज मेखले, साहेबराव महाराज नेहराळे, मृदुंगाचार्य रमेश महाराज पिसाळ, आकाश महाराज मस्के, साहेबराव महाराज पिसाळ, विद्यानेश्वर वारकरी संस्थेतील छोटे वारकरी तसेच ग्रामस्थ व पंचक्रोशीतील भाविक-भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आज श्रीकृष्ण महाराज उबाळे यांचे कीर्तन

या सप्ताहामध्ये आज तिसऱ्यादिवशीची कीर्तनसेवा हभप श्रीकृष्ण महाराज उबाळे यांची होणार आहे. तरी पंचक्रोशीतील भाविकभक्तांनी रात्री ९ ते ११ यावेळत उपस्थित राहून कीर्तनाचा लाभ घ्यावा असेव आवाहन रामनगर ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आले आहे.

# शिक्षण हाच परिवर्तनाचा खरा मार्ग–प्राजक्ताताई धस

## पाटोदा नगरपंचायत हद्दीतील अंगणवाड्यांना एलसीडी टीव्हींचे वितरण



पाटोदा दि.१३ (महेश बेदरे)- शून्य ते सहा हा वयोगट मुलांच्या बुद्धिमत्तेच्या विकासाचा सर्वात महत्त्वाचा टप्पा आहे. पाया भक्कम असेल तरच आयुष्याची इमारत मजबूत उभी राहते. शिक्षण हाच जीवनात परिवर्तन घडविण्याचा खरा मार्ग आहे, असे प्रभावी प्रतिपादन महानंदाच्या संचालिका प्राजक्ता सुरेश धस यांनी केले. त्या पाटोदा नगरपंचायत हद्दीतील १९ अंगणवाड्यांना एलसीडी टीव्ही वितरण कार्यक्रमात बोलत होत्या.

प्राजक्ताताई धस यांच्या संकल्पनेतून आणि पाटोदा नगरपंचायतीच्या माध्यमातून डिजिटल शिक्षणाचा हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा दिपाली जाधव होत्या. व्यासपीठावर पर्यवेक्षिका जाधव, नगरपंचायत सभापती आरती गोरे, निलावती वाघमारे, माजी नगराध्यक्षा मनीषा पोटे, सारिका कदम, दामिनी पारगावकर, उपनगराध्यक्ष गीते सभापती अडागळे काळे, सोमीनाथ कोल्हे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

पालकांनी दररोज दोन तास मुलांसाठी राखावेत प्राजक्ताताईंनी आपल्या भाषणात पालकांना थेट संदेश देताना सांगितले की, आजच्या धकाधकीच्या जीवनात वेळ नसल्याचे कारण दिले जाते; परंतु मुलांच्या घडणीच्या काळात दररोज किमान दोन तास मुलांसाठी देणे ही प्रत्येक पालकाची जबाबदारी आहे. अंगणवाडी ही केवळ पोषण देणारी संस्था नसून ती शिक्षण, संस्कार आणि संरक्षण देणारे पहिले केंद्र आहे. अलीकडेच कॉपीमुक्तीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना रस्त्यावर उतरावे लागल्याची बाब दुर्दैवी असल्याचे सांगत त्यांनी शिक्षणात मजबूत पाया घालण्याची गरज अधोरेखित केली. शिक्षकांचे स्थान अबाधित ठेवण्याचे कार्य आ.सुरेश धस यांच्या माध्यमातून जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमांचा सकारात्मक परिणाम दिसून येत असल्याचे त्यांनी सांगितले. त्या शिक्षणाबरोबरच बालविवाह रोखणे, आरोग्य सर्वेक्षण आणि पोषण अभियान अशा विविध जबाबदाऱ्या पार पाडतात. त्यामुळे त्यांचा सन्मान करणे आवश्यक आहे, असे प्राजक्ताताईंनी स्पष्ट केले. उच्च शिक्षणात मुलींचे प्रमाण कमी असल्याच्या पार्श्वभूमीवर प्राथमिक स्तरावरच मुलींच्या शिक्षणाला चालना देणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.महिलांसाठी सकारात्मक निर्णय वित्त आयोगाचा प्रस्ताव समोर आल्यानंतर सर्वप्रथम महिलांसाठी आणि महिलांच्या माध्यमातून समाजहिताचे काम व्हावे, अशी सूचना आपण केली होती. त्यातूनच अंगणवाड्यांना एलसीडी टीव्ही देण्याचा निर्णय घेण्यात आला आणि आज तो साकार झाला, असे त्यांनी सांगितले. अंगणवाडी डिजिटल करण्यासाठी तसेच इतर सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण कायम कटिबद्ध असल्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

नगराध्यक्षा दिपाली जाधव यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, आमदार सुरेश आण्णा धस आणि प्राजक्ताताई धस यांच्या मार्गदर्शनामुळे हा उपक्रम यशस्वी झाला. अंगणवाडी सेविकांच्या गळ्यात सन्मानाचे पदक पाहून अभिमान वाटत असल्याचे त्यांनी नमूद केले.

# राज्यात उन्हाळ्याची चाहुल, पण सकाळी–रात्री गारवा कायम

मुंबई: अजूनही तापमानात फारशी वाढ झाली नसली तरी वातावरणाला उन्हाळ्याची चाहूल लागली आहे. त्याचाच परिणाम म्हणून दुपारी काहीशी गर्मी जाणवत आहे. मात्र तरीही सकाळी आणि रात्री गारवा कायम आहे. मुख्य म्हणजे अजूनही आल्हाददायक वातावरणाची अनुभूती मिळत आहे.

बहुतांश जानेवारी महिन्यापर्यंत कमाल तापमान २७ते २८ अंश, तर किमान तापमान १४ ते १५ अंशाच्या दरम्यान होते. मात्र फेब्रुवारी महिन्यात कमाल तापमान सुमारे ३० अंशाच्या घरात गेले, तर किमान तापमानही १५ अंशाच्या पुढे सरकले. त्याचवेळी मंगळवारी कमाल तापमान ३१.८, तर किमान तापमान १५.५ अंशांपर्यंत पोहोचल्याची नोंद चिकलठाणा वेधशाळेत झाली. साहजिकच मागच्या चार-पाच दिवसांत कमाल तापमानात पावणेदोन अंशांची वाढ झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

अर्थात, किमान तापमानात वाढ झाली नसल्यानेच सकाळी व रात्री गारवा कायम आहे. त्यामुळे दुपारी काहीशी गर्मी जाणवत असून, उन्हाळी वातावरणाची चाहूल लागल्याचे जाणवत आहे. दुसरीकडे, घराघरांमधील पंखेही आता सुरू झाले आहेत. निदान दुपारी तरी पंखे वापरण्याची वेळ येत आहे.


दै.पार्श्वभूमी,बीड Date-14/02/2026

**CHANGE IN NAME**

I DECLARED BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME OF

**OLD NAME - AATAR SAMEER HASAM**

**New Name : SAMEER HASHAM ATTAR**

Address-At.Bramhagav Post Tq Majalgaon Dist Beed, Manjlegaon (rural), Majalgaon, Beed, Maharashtra,431131 Mob.:+919011213814

## आज लिंबारूई येथे ह.भ.प. इंदुरीकर महाराज यांचे किर्तन

नवगण राजुरी दि.१३(प्रतिनिधी) - येथून जवळच असलेल्या श्रीक्षेत्र संगमेश्वर संस्थान, लिंबारूई येथे बालयोगी श्रीसंत भगवान बाबाजी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या अखंड हरीनाम सप्ताहात आज शनिवार दि.१४ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्रातील प्रसिद्ध किर्तनकार ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांचे सायंकाळी ५.३० ते रात्री ७.३० या वेळेत हरीकिर्तन होणार आहे. तरी या किर्तन सेवेचा भाविक भक्तांनी अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन समस्त ग्रामस्थ मंडळी, लिंबारूई यांनी केले आहे

## आज कोळेकर महाराज यांचे कीर्तन



बीड दि.१३ (प्रतिनिधी):-गेवराई तालुक्यातील चकलांबा येथे प्रतिवर्षाप्रमाणे गुरुवार दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ पासून चार दिवसीय शिवरात्री महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. शनिवार दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री ८.०० ते १०.०० या वेळात ह.भ.प. धुराजी महाराज कोळेकर यांचे कीर्तन होणार आहे.ह.भ.प. कैलास महाराज खेडकर यांची दुपारी २.०० ते ४.३० वाजता शिवलीलामृत कथा आयोजित केली आहे.

पान २ वर

# स्वत:ची जागा नसलेल्या पाटोद्यातील अंगणवाड्या 'स्मार्ट' कशा होणार?



## सौ.नीलाताई पोकळे यांचा सवाल

पाटोदा दि १३ (प्रतिनिधी)- पाटोदा शहरातील अंगणवाड्यांची दयनीय अवस्था पुन्हा एकदा समोर आली आहे. शहरातील बहुतांश अंगणवाड्या आजही स्वतःच्या इमारतीविना भाड्याच्या छोट्या-छोट्या खोल्यांमध्ये चालवल्या जात आहेत. अशा परिस्थितीत या अंगणवाड्या 'स्मार्ट' किंवा 'डिजिटल' कशा होणार? असा सवाल सौ. निलाताई पोकळे यांनी उपस्थित केला आहे

शासनाकडून अंगणवाड्यांचे आधुनिकीकरण, डिजिटल शिक्षण, स्मार्ट टीव्ही, शैक्षणिक साहित्य अशा योजना राबवल्या जात असल्याची घोषणा केली जाते. मात्र प्रत्यक्षात मुलांना बसण्यासाठी पुरेशी जागा नाही, खेळण्यासाठी अंगण नाही, स्वच्छतागृहांची सोय अपुरी आहे, अशा अनेक मूलभूत अडचणींचा सामना करावा लागत आहे. भाड्याच्या खोलीत चालणाऱ्या अंगणवाड्यांमध्ये वीज, पाणी आणि सुरक्षिततेचे प्रश्न कायम आहेत. पावसाळ्यात गळती, उन्हाळ्यात उकाडा आणि अपुरी जागा यामुळे बालकांचे आरोग्य व शिक्षण दोन्ही धोक्यात येत आहे. अशा परिस्थितीत डिजिटल साधनांचा वापर करणेही कठीण आहे. सौ. नीलाताई पोकळे यांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे ज्यामध्ये पाटोदा शहरातील प्रत्येक अंगणवाडीसाठी स्वतंत्र, सुसज्ज व सुरक्षित इमारत उभारण्यात यावी. तसेच अंगण, खेळणी, स्वच्छ पिण्याचे पाणी आणि शौचालयाची योग्य व्यवस्था करण्यात यावी.लहान मुलांच्या शिक्षणाचा पाया मजबूत करण्यासाठी अंगणवाडी ही महत्त्वाची पायरी आहे. त्यामुळे केवळ कागदोपत्री योजना न राबवता प्रत्यक्षात ठोस पावले उचलण्याची गरज असल्याची भावना सौ. निलाताई पोकळे यांनी वेक्त केली आहे.

## दीपा मुधोळकर यांच्या उपस्थितीत व्यसनमुक्ती कार्यशाळा



बीड दि.१३(प्रतिनिधी):- राज्यात विविध जिल्ह्यात व्यसनमुक्ती कार्यशाळा राबविण्यात आले आहे. यानंतर पुणे येथे बीडच्या तत्कालीन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांच्या उपस्थितीत व्यसनमुक्ती कार्यशाळेचा समारोप करण्यात आला. महाराष्ट्रात विविध जिल्ह्यात व्यसनमुक्ती कार्यशाळा राबवण्यात आल्या राज्यातील विविध ठिकाणी राबविण्यात आलेल्या व्यसनमुक्ती कार्यशाळेनंतर पुणे येथे व्यसनमुक्ती कार्यशाळा घेण्यात आली हा कार्यक्रम बीडच्या तत्कालीन जिल्हाधिकारी दीपा मुधोळकर यांच्या उपस्थितीत पार पडला. आजचा तरुण व्यसनाधीन कडे वळत आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या वतीने तरुणांना व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी शासन आणि सामाजिक संस्थेच्या माध्यमातून व्यसनमुक्ती कार्यशाळा राबवण्यात येत आहे या कार्यशाळेच्या माध्यमातून तरुणांनी व्यसनापासून दूर करावे यासाठी मार्गदर्शन केले जाते समारोपीय कार्यशाळा पुणे येथे पार पडली असून या कार्यशाळेत दीपा मुधोळकर यांनी उपस्थित यांना मार्गदर्शन

पान २ वर

# जिल्हा उपनिबंधक सतीश तोटावार यांची बीड जिल्हा बँकेच्या धारूर शाखेस भेट

किल्लेधारूर दि १३ ( प्रतिनिधी )-बीड जिल्हा उपनिबंधक सतिश तोटावार यांनी दि.बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या धारुर शाखेस भेट देऊन कर्जमाफी कामकाजा संदर्भात आढावा बैठक घेऊन मार्गदर्शन केले. कर्जमाफीचे कामकाज जलद गतिने करुन एकही शेतकरी वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी असे त्यांनी यावेळी सांगितले. सर्व माध्यमांचे सहकार्य घेऊन कर्जदार सभासदापर्यंत पोहचून माहिती घेण्याच्या सुचनाही केल्या. शेतकऱ्यांनी आपली कागदपत्रे सेवा सोसायटीकडे जमा करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी सहाय्यक निबंधक ऋषिकेश कातळे , सर्व सचिव तसेच बँक कर्मचारी उपस्थित होते.

### विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

# कॉपीमुक्त अभियानासाठी ठोस पावले उचला

छत्रपती संभाजीनगर दि.१३(विमाका):- छत्रपती संभाजीनगर विभागातील काही परीक्षा केंद्रांवर घडलेल्या गैरप्रकारांच्या बातम्या राज्यात पोहोचल्या असून, यामुळे विभागाच्या प्रतिमेला धक्का बसला आहे. त्यामुळे यापुढे अशा घटना घडू नयेत, यासाठी सर्व यंत्रणांनी अधिक जबाबदारीने काम करावे, असे निर्देश विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दिले.

दहावी व बारावी परीक्षांच्या पार्श्वभूमीवर विभागातील पोलीस उपमहानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर, नांदेड जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प., पोलीस अधिक्षक, विभागीय शिक्षण उपसंचालक, एसएससी बोर्डाचे अध्यक्ष व सचिव, तसेच शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक यांच्यासमवेत विभागीय आयुक्त पापळकर यांनी आढावा बैठक घेतली. बैठकीत काही केंद्रांवर कॉपी व गैरप्रकार झाल्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या घटनांमुळे वृत्तपत्रांमध्ये नकारात्मक बातम्या प्रसिद्ध झाल्याने विभागाच्या कामकाजात सुधारणा करण्याची गरज असल्याचे आयुक्तांनी नमूद केले.महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अंतर्गत होणाऱ्या परीक्षांमध्ये पारदर्शकता राखण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात नियंत्रण कक्ष, भरारी पथके व निरीक्षण व्यवस्था अधिक मजबूत करण्याचे निर्देश आयुक्त पापळकर यांनी दिले.बैठकीत सांगण्यात आले की, बीड जिल्ह्यात १०३ परीक्षा केंद्रांसाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष व १०३ पथके कार्यरत करण्यात आली आहेत. तसेच सर्व केंद्रांवर नियमित तपासणी केली जात आहे.छत्रपती संभाजीनगर व बीड येथील काही शिक्षकांवर निलंबनाची कारवाई प्रस्तावित करण्यात आली असून, संबंधित संस्थेच्या

## सौ.के.एस.के. महाविद्यालयामध्ये वार्षिक स्नेहसंमेलना प्रदर्शन संपन्न

बीड (प्रतिनिधी) : सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बीड येथे दि. ०६ फेब्रुवारी २०२६ वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले. यावेळी गृहशास्त्र विभागाच्या वतीने रांगोळी, पुष्परचना व पाककला स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या विविध स्पर्धामध्ये सहभागी विद्यार्थ्यांचे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक काढून प्रमाणपत्र देण्यात आले.

# ना.फडणवीस व ना.राठोड यांच्या उपस्थितीत पोहरादेवीत संत सेवालाल महाराज जयंती व पर्यटन महोत्सवाचे आयोजन



गेवराई दि.१३ (प्रतिनिधी):-देशातील पंधरा कोटी बंजारा समाज बांधवांची पवित्र काशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या वाशिम जिल्ह्यातील पोहरादेवी येथे शनिवार दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी राज्याचे कणखर व लोकप्रिय मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस , उपमुख्यमंत्री ना. एकनाथरावजी शिंदे उपमुख्यमंत्री ना.सुनेत्रा ताई अजित पवार व बंजारा समाजाचे युवा नेते तथा राज्यमंत्री ना.इंद्रनील भाऊ नाईक यांच्या व संत महंतांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संत सेवालाल महाराज जयंती व भव्य पर्यटन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे आयोजन राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा बंजारा समाजाचे धाडसी नेते, मंत्री ना. संजयभाऊ राठोड यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली व पुढाकाराने व महाराष्ट्र पर्यटन विभागाच्या सहकार्याने संपन्न होणार आहे.या भव्यदिव्य ऐतिहासिक कार्यक्रमाला राज्यातील बंजारा समाज बांधवांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य तथा संत सेवालाल महाराज बंजारा/लबाणा तांडा समृद्धी योजनेचे अशासकीय सदस्य प्रा.पी.टी.चव्हाण यांनी केले आहे.

पोहरादेवी तिर्थक्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी ना.संजयभाऊ राठोड यांनी मागील अनेक वर्षांपासून सातत्याने सरकारकडे पाठपुरावा सुरू ठेवला होता. मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस साहेब व महायुती सरकारने मंत्री ना.राठोड न्यायिक व समाजपयोगी मागणीची सकारात्मक दखल घेऊन आता पर्यंत ८०० कोटींच्या आसपास भरघोस विकास निधी उपलब्ध करून दिला आहे. या निधीतून पोहरादेवी येथे संत सेवालाल महाराज,संत रामराव महाराज,सामकी माता या देवीदेवतांची आंतरराष्ट्रीय दर्जाचे मंदिर व समाधीस्थळ निर्माण करण्यात येत आहे. मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस व उपमुख्यमंत्री ना.एकनाथराव शिंदे यांच्या सामाजिक व आर्थिक सहकार्यामुळे खऱ्या अर्थाने पोहरादेवी तिर्थक्षेत्र जगाच्या नकाशावर ठळकपणे दिसून येत आहे. पोहरादेवीच्या विकास प्रक्रियेत तत्कालीन ग्रामविकास

पान २ वर

# वेदशास्त्र संपन्न किरण गुरु गोसावी यांना पितृशोक

## मोगऱ्याचे अरुण काका गोसावी यांचे निधन



माजलगाव दि.१३(प्रतिनिधी) मोगरा येथील प्रतिष्ठित नागरिक अत्यंत धार्मिक, मनमिळावू स्मित भाषी समाजसेवक अरुण काका गोसावी वय ६५ वर्षे यांचे दिनांक १३ फेब्रुवारी शुक्रवार रोजी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास परभणी येथील एका खाजगी रुग्णालयामध्ये उपचार सुरू असताना प्रकृतीने साथ न दिल्याने दुःखद निधन झाले आहे. वेदशास्त्र संपन्न किरण गुरु गोसावी मोगरेकर यांचे ते वडील होते प्राध्यापक डॉक्टर सुधाकर गोसावी यांचे ते लहान बंधू होते.

सलग पंधरा दिवस मृत्यूशी झुंज देत सामाजिक बांधिलकी, माणुसकी आणि मूल्यनिष्ठेचा वारसा जपणारा एक निखारा अखेर शांत झाला.माजलगाव येथे नातेवाईकांना भेटण्यासाठी आलेले आरुण काका गोसावी साबळे हॉस्पिटल परिसरात रस्ता क्रॉस करत असताना अज्ञात वाहनाच्या धडकेत गंभीर जखमी झाले. डोक्याला जबर मार लागल्याने ते तत्काळ बेशुद्ध अवस्थेत गेले. प्राथमिक उपचारानंतर परभणी येथील खाजगी रुग्णालयात त्यांना दाखल करण्यात आले. त्यानंतर सलग पंधरा दिवस ते कोमात होते. वैद्यकीय प्रयत्न सुरू असतानाही उपचारांना अपेक्षित प्रतिसाद मिळत नव्हता. अखेर दि.१३ फेब्रुवारी शुक्रवार रोजी सकाळी नियतीने अंतिम निर्णय घेतला आणि त्यांची प्राणज्योत मालवली. आणि परभणी येथे दुपारी त्यांच्या पार्थ दयावर अंत्यसंस्कार करण्यात आले.आरुण काका हे गावातील सर्वपरिचित, सर्वसमावेशक आणि विश्वासार्ह व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे सामाजिक योगदान, साधेपणा आणि माणुसकी हीच त्यांची खरी ओळख होती. त्यांच्या जाण्याने गावाच्या सामाजिक फॅब्रिकमध्ये मोठी पोकळी निर्माण झाली आहे- ही हानी भरून न निघणारी आहे. त्यांच्या पश्चात भाऊ भाऊजी एक मुलगा एक मुलगी सून नातवंडे असा परिवार आहे.

## गुजर समाजाकडून नगराध्यक्ष प्रतिनिधी व सभापतींचा सत्कार

बीड दि.१३(प्रतिनिधी):- बीड नगराध्यक्षांचे प्रतिनिधी मुजीब शेख व नगरपरिषदेचे सभापती निजाम शेख यांचा गुजर समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी बीड शहराच्या सर्वांगीण विकासाबाबत त्यांच्याकडून मोठ्या अपेक्षा व्यक्त करण्यात आल्या.गुजर युवक संघटनेचे जिल्हाध्यक्ष हनुमान बहिरवाळ व अखिल भारतीय देवसेनेचे जिल्हाध्यक्ष रतन गुजर यांनी स्वच्छता, रस्ते, नाल्या, पाणी व वीज या मूलभूत सुविधांकडे विशेष लक्ष देण्याची मागणी केली. शहरवासीयांच्या अपेक्षा पूर्ण करून बीड शहर स्वच्छ व सुंदर करण्यासाठी कार्य कराल, अशी अपेक्षा व्यक्त करत पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या. या सत्कारप्रसंगी ॲड. खाजाभाई, मुन्नाभाई, गुजर युवक संघटनेचे जिल्हाध्यक्ष हनुमान बहिरवाळ,

पान २ वर



बीड - येथील ज्येष्ठ समाजसेवक अलीम टेलर यांचे पुतणे हाफीज सय्यद मोहम्मद शाकेर सय्यद सलिम अशरफी यांनी मुफ्ती मोहम्मद अतिकुर्रहेमान कासमी अनवारुल उलुम माळापुरी यांच्या मार्गदर्शनाखाली पवित्र कुराणचे संपूर्ण ३० पारे (अध्याय) पुर्ण केले. याबद्दल त्यांचे अभिनंदन करतांना समाजसेवक जे.डी.शाह,सय्यद राफे अलिम टेलर आदी.

## मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा

बीड- शहरातील गल्ल्यात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट असुन गाडीवरून जा-ये करतांना हे कुत्रे अंगावर येतात.त्यामुळे अपघात होत आहेत.

# जटाशंकर मंदिराचा आज पालखी सोहळा

बीड दि १३(प्रतिनिधी)- दरवर्षीप्रमाणे याही वर्षी १४ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता महाशिवरात्रीनिमित्त जटाशंकर मंदिर थिगळे गल्ली येथे भव्य पालखी सोहळ्याचे नियोजन केलेले आहे तरी सर्व बीड वासियांनी पालखी सोहळ्यास आवर्जून उपस्थित राहुन पालखी सोहळ्याची शोभा वाढवावी असे आवाहन श्री जटाशंकर मित्र मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे. पालखी मार्ग जटाशंकर मंदिर पासुन लक्ष्मी मंदिर. छापखाना गल्ली. धोंडीपुरा मार्गे सराफ लाईन. सावरकर शाळा.थिगळे गल्ली मार्गे जटाशंकर मंदिर येथे पालखीचे स्वागत व आरती संपन्न होईल.

पान २ वर



अमरावती येथे लखनऊचे महान संत श्री हरीषलाल यांचा फोटो, शाल व भेटवस्तू देऊन सत्कार करतांना डॉ.एम.बी.जेसवाणी व ईश्वर टेकवाणी.

## भाग्यश्री जयवंत गोरे यांची तालुका कृषी अधिकारीपदी निवड



जामखेड प्रतिनिधी :- भाग्यश्री चे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद मराठी मुलींची शाळा कर्जत येथे झाले असून माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण कन्या विद्या मंदिर कर्जत व महात्मा गांधी जुनियर कॉलेज येथे झाले तर पदवीचे शिक्षण नाशिक येथील के. के. वाघ महाविद्यालयात (Bsc.-griculture) पूर्ण केले. ग्रामीण भागातून येत कठोर परिश्रम, चिकाटी आणि जिद्दीच्या जोरावर तिने हे यश संपादन केले आहे. भाग्यश्री चे वडील आरटीओ चे काम करत असून चुलते अशोक गोरे शेतकरी यांनीही, मोठ्या कष्टाने व त्यागाने त्यांनी आपल्या मुलीच्या शिक्षणासाठी दिलेले पाठबळ निश्चितच प्रेरणादायी आहे. त्यांच्या या संघर्षाला आणि कुटुंबाच्या योगदानालाही मनःपूर्वक सलाम व अभिनंदन. भाग्यश्री ही एक उत्तम खेळाडू आहे. भाग्यश्री चा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे या निवडीपूर्वी ती गोंदिया जिल्ह्यातील गोरेगाव तालुक्यात 'कृषी सेवक' म्हणून कार्यरत होती आदिवासी आणि दुर्गम भागात आपली नोकरीची जबाबदारी सांभाळत असतानाच तिने जिद्दीने आपला अभ्यास सुरू ठेवला. खेळाडू वृत्ती आणि अफाट कष्टाच्या जोरावर प्रशासकीय

पान २ वर


## एल.डी.सी.नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बीड.

डी.सी.लोढा चेंबर्स, सुभाष रोड, बीड-431122

**पाहिजेत**

एल.डी.सी.नागरी सहकारी पतसंस्थेकरीता खालील पदे भरणे आहेत.

| अ.क्र. | पद | पात्रता | जागा |
|---|---|---|---|
| 1 | व्यवस्थापक | B.Com कॉम्प्युटर ज्ञान असणे आवश्यक | 1 |
| 2 | लिपीक | B.Com कॉम्प्युटर ज्ञान असणे आवश्यक | 1 |
| 3 | शिपाई | 12 वी पास | 1 |

टीप:- वरील पदे त्वरीत भरणे आहेत. तरी खालील मोबाईल नंबरवर त्वरीत संपर्क साधावा.

7020949156


## लोकमान्य टिळक माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ संपन्न

बीड दि.१३(प्रतिनिधी):- १३ फेब्रुवारी शुक्रवारी विद्यालयात सन २०२५ -२६ इयत्ता १०वी च्या विद्यार्थ्यांना निरोप / ऋणनिर्देश कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले . कार्यक्रमाचे अध्यक्ष राजेंद्र आगवान संपादक तर प्रमुख पाहूणे शेख मजिद सहसंपादक, माजी सरपंच विक्रमअण्णा शेंडगे व राम माने हे होते. अध्यक्ष व प्रमुख पाहुण्याच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले या प्रसंगी ५वी ते ९ वी च्याविद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून शुभेच्छा दिल्या व इ १० वी च्या विद्यार्थ्यांनी शाळेत शिकत असतानाचे अनुभव कथन केले . अध्यक्ष , प्रमुख पाहुणे व शिक्षकानीआपल्या मनोगताच्या माध्यमातून शिक्षणाविषयीची जिद्द, चिकाटी , अनुभव तसेच सामाजिक बांधिलकी, करीअर मार्गदर्शन या विषयी आपले विचार मांडले व शुभेच्छा दिल्या . कार्यक्रमास पालक व नागारीक बहुसंख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम शाळेचे मु .अ घोडके सर यांच्या मार्गदर्शना खाली पार पडला कार्यक्रमाचे प्रास्ताविक शेटे सर यांनी केले , सुत्रसंचालंन शेलार सर व आभार श्रीम. पांडूळे मॅडम यांनी मानले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक शिक्षिका व कर्मचारी यांनी परीश्रम घेतले .

# चंपावती महोत्सवात श्री नारायण विद्यालयाचे सुयश

बीड दि.१३(प्रतिनिधी):- महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने आयोजित केलेल्या चंपावती महोत्सवात श्री नारायण विद्यालयाने घवघवीत यश मिळवले आहे. बीड तालुक्यातील आहेर चिंचोली येथील श्री नारायण विद्यालयाने समूह नृत्य मध्ये बक्षीस पटकावले आहे. यावर्षी शाळेने प्रथमच सहभाग नोंदवला आणि जिल्हास्तरीय नृत्य स्पर्धेत पारितोषिक पटकावले आहे. ग्रामीण भागातील शाळा असूनही एकसंग पणे समूह नृत्य करून हे पारितोषिक मिळविले आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री महादेवराव काळे अण्णा, तसेच संस्थेचे सचिव तथा प्राचार्य श्री अमोल काळे सर, श्रीमती काळे मॅडम यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. श्रीमती काळे मॅडम यांनी जवळपास पंधरा दिवस विद्यार्थ्यांचा सराव करून घेतला होता. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रा. अशोक घरत सर, श्रीमती काळे मॅडम, श्रीमती भुतावळे मॅडम, श्रीमती मस्के मॅडम, श्रीमती जगताप मॅडम यांनी सहकार्य केले.